म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय ........ चा. वा
दा. क्र. ८८

# कारस्थान

अर्थात्

सर वॉल्टर स्कॉटकृत

## आयव्हॅन्हो

म. ग्रं. सं. ...
दा. क्र. ९८ ... क्र. ...
विषय किशोर

अनुवादक

**प्रकाश रंजन**

प्रस्तावना

**भा. रा. भागवत**

BVBK-0400098

किंमत १.७०

लाखाणी बुक डेपो, मुंबई ४

[illegible]लाणी बुक डेपो,
रामचंद्र बिल्डिंग,
४३७, न्यू चर्नीरोड,
गिरगांव, मुंबई ४

सर्वाधिकार प्रकाशकाधीन
सप्टेंबर १९६२

मुद्रक :
के. एल्. एन्. राव
मुंबई वैभव प्रेस, ४१७/४२१
सरदार वल्लभभाई पटेल रोड
गिरगांव, मुंबई नं. ४

# प्र स्ता व ना

**आयव्हॅनूहो**नें मला **केनिलवर्थ**ची आठवण करून दिली. स्कॉटच्या त्या सर्वोत्कृष्ट कादंबरीचा अनुवाद मीं कांहीं दिवसांपूर्वी केला आणि आमचे मित्र श्री. बाबूभाई लाखाणी यांनीं तो प्रसिद्ध केला. त्या **किल्ल्यांतील कारस्थाना**नंतर लगेच हें **सरदारी कारस्थान** प्रकाशांत आणण्याची त्यांना प्रेरणा व्हावी हें सयुक्तिकच म्हटलें पाहिजे ! त्यांच्याच सांगण्यावरून हे प्रास्ताविक चार शब्द मी लिहीत आहें.

प्रस्तुत कादंबरीचा काळ देखील इंग्लंडच्या इतिहासांतला फंदफितुरीचा व कारस्थानांचा कालखंड होता. नॉर्मनांनीं इंग्लंड जिंकलें होतें; पण अजून स्थिर-स्थावर अंमल त्यांना प्रस्थापित करतां आलेला नव्हता. बऱ्याच जुन्या सरदारांचा नवीन सत्तेला विरोध होता. पण या सरंजामी सरदारांच्या विरोधामागें पुष्कळदा देशप्रेम असण्याऐवजीं स्वार्थबुद्धि असे. त्यांतच पूर्व युरोपवर मुसलमानी आक्रमण झालें होतें आणि बहुतेक राष्ट्रें या धर्मयुद्धांत ओढलीं गेलेलीं होतीं. इंग्लंडचा रिचर्ड राजाही त्याच उद्योगांत होता; आणि ही संधी साधून त्याच्या दुष्टबुद्धि भावानें राज्य बळकावलें होतें. पुढें रिचर्डसारखा सिंहहृदयी राजा इंग्लंडला वेळींच परतला नसता तर इंग्लंडच्या इतिहासाला कदाचित् वेगळेंच वळण लागलें असतें. अशा शौर्यशाली काळांतली कथा आणि तिला रॉबिन हुडसारख्या लहानथोरांना प्रिय अशा वीरनायकाची आणखी जोड, यामुळें 'आयव्हॅनूहो'चें कथानक बहारदार झालें आहे.

'केनिलवर्थ' कादंबरी उत्कंठा व रहस्य या गुणांत जशी उजवी आहे, तशी 'आयव्हॅनूहो' ही द्रुतगति प्रसंगांनीं भरलेली कथा ( Action Story ) म्हणून अद्वितीय वाटते. ज्यांनीं या कादंबरीवरचा चित्रपट पाहिला असेल त्यांना याची

कल्पना येईलच. इतकी गतिमान् कथा स्कॉटनें रचली तेव्हां तो शरीरानें दुबळा बनलेला होता. आजारपणांत बिछान्यावर पडल्या पडल्या, तोंडीं सांगून त्यानें ती छापखान्याला पाठवली. हें ऐकलें म्हणजे स्कॉटच्या प्रतिभेबद्दल विस्मय वाटतो.

श्री. प्रकाश रंजन यांनीं पुस्तकरूपांत केलेला हा पहिला अनुवाद असेल; पण मला तो निःसंशयपणें कौतुकास्पद वाटतो. शब्दावडंबर न करतां समर्पक व सुटसुटीत वाक्यें वापरण्याची हातोटी त्यांच्याजवळ आहे. त्यापायीं यथोचित वर्णनशैलीकडे मात्र त्यांनीं दुर्लक्ष करूं नये. आयव्हॅनोचें स्पेलिंग Ivanhoe असें आहे. म्हणजे शेवटीं 'व्हो' यायला हवें. पण शेवटच्या अक्षरांतील 'ह' चा उच्चार अस्पष्ट असल्यामुळें–आपण नेहमीं 'आयव्हॅनो' च म्हणतों–अनुवादकानें ही 'ह' ची अडगळ दूर सारली असावी. नाहींतरी या पुस्तकांत आधींच उच्चारक्लिष्ट इंग्रजी नांवें बरींच आहेत त्यांत आणखी भर कशाला, अशा दृष्टीनें 'आयव्हॅनो' हें त्यांतल्या त्यांत सुलभ-लिखित रूप मलाही अयोग्य वाटत नाहीं.

श्री. प्रकाश रंजन यांच्या या छोट्या अनुवादाचें मनःपूर्वक स्वागत करून अनुवादलेखनांत त्यांना अधिकाधिक यश मिळो अशी सदिच्छा मी व्यक्त करतों.

—भा. रा. भागवत

# १ रॉबिनहुडच्या गर्दीत

हिरव्यागार जंगलांनीं व्याप्त असलेलें डॉन नदीचें खोरें हा इंग्लंड-मधील एक अत्यंत रमणीय प्रदेश होता. रॉबिन हुडच्या दिलदार साहसांनीं हाच प्रदेश दुमदुमून उठला होता आणि गुलाबांच्या युद्धांतील कांहीं घनचक्कर लढाया ह्याच भागांत खेळल्या गेल्या.

बाराव्या शतकाच्या उत्तरार्धांत आपल्या गोष्टीला सुरवात होत आहे. इंग्लंडच्या गादीवर नुकताच विराजमान झालेला रिचर्ड हा मोठा निधड्या छातीचा लढवय्या. जेरुसलेम ह्या खिश्चनांच्या पवित्र शहराची तुर्कांच्या मगरमिठींतून सुटका करण्यासाठीं युरोपांतील अनेक राजे-सरदार ह्या धर्मयुद्धांत त्या वेळेस सामील झाले होते. मर्दुमकी गाजवण्याची आयती आलेली ही संधि रिचर्ड कशा वायां घालवील? आपल्याबरोबर निवडक शूर सरदारांची आणि शिलेदारांची तुकडी घेऊन हा 'सिंहहृदयी' राजा जेरुसलेमची ... गेला; आणि राज्यकारभार त्याचा धा... हातांत आला.

BVBK-0400098

जोंपर्यंत रिचर्डसारखा पराक्रमी राज... ...ता, तोपर्यंत सरदार-दरकदार त्याला वचकून असत. पण रिचर्ड दूर युद्धावर निघून गेल्यावर ह्या सरदारांचें फावलें. गोरगरिबांचा ते छळ करूं लागले. जॉनच्या भोंवती अशा जुलमी आणि तोंडपुज्या सरदारांचा गोतावळा निर्माण झाला होता. ह्या सरदारांचीं आपसांत भांडणें अन् मारामाऱ्या, परस्परांच्या ताब्यांतील प्रदेशांची लूट करणें असले प्रकार नेहमींच चालायचे. त्यामुळें गरीब शेतकऱ्याला आपली जमीन सुरक्षित राखायची म्हणजे एखाद्या बड्या सरदाराचा आश्रय घ्यावा लागे. ह्या सरदारांचे किल्लेकोट ही गरिबांचीं आश्रयस्थानें. मात्र संरक्षणाच्या

बदल्यांत गरीब शेतकरी आपलें स्वातंत्र्य गमावून बसे. सरदार देईल तो न्याय आणि त्याचा शब्द म्हणजे कायदा अशी परिस्थिति होती.

इ. स. १०६६ मध्यें फ्रान्समधील नॉर्मंडी प्रांतांतून आलेल्या विल्यमनें इंग्लिश राजा हॅरॉल्ड ह्याचा पराभव केला. तेव्हांपासून ह्या नॉर्मंडींतून आलेल्या नॉर्मन लोकांचें वर्चस्व, इंग्लंडमध्यें पूर्वींपासून वस्ती करून राहिलेल्या सक्सन लोकांवर चालत होतें. राजा अर्थातच नॉर्मन होता आणि प्रमुख सरदारही नॉर्मन होते. त्यांची भाषा होती फ्रेंच. कांहीं छोटे पण शूर सॅक्सन सरदार मात्र आपल्या जमिनी आणि सरदारी टिकवून होते. त्यांना फ्रॅन्कलिन म्हणत. परकीय नॉर्मन लोकांबद्दल अर्थातच त्यांना मुळींच आपलेपणा वाटत नसे. कधींतरी ह्या नॉर्मन लोकांना हाकलून देण्यांत आपल्याला यश येईल आणि इंग्लंडमध्यें पुन्हा सॅक्सन राजा राज्य करूं लागेल अशी महत्त्वाकांक्षा बाळगून होते ते.

अशा स्वाभिमानी सॅक्सन सरदारांत रॉदरवुडचा सेड्रिक हा प्रख्यात होता. वृद्ध असला तरी अतिशय शूर म्हणून त्याची ख्याति होती. नॉर्मन लोकांचा तो प्रखर द्वेष्टा होता खरा; पण त्यांच्या प्रबल सत्तेपुढें त्याचें एकट्याचें काय चालणार ? तरी त्याचे त्या दृष्टीनें प्रयत्न नेहमींच चालू असत. आपल्या मुलाला त्यानें उत्कृष्ट लष्करी शिक्षण देऊन तयार केलें होतें. आपल्या मुलानें आपलेच प्रयत्न पुढें चालू ठेवावे अशी त्याची इच्छा. पण सेड्रिकची शिस्त अतिशय कडक. एकदा एका क्षुल्लक गोष्टींत मुलानें आपलें ऐकलें नाहीं म्हणून त्यानें, त्याला लहान असतांनाही रिचर्डबरोबर धर्मयुद्धावर पाठवलें. तेव्हांपासून मुलाची कांहींच वार्ता नव्हती, तरी म्हाताऱ्याला त्याची फारशी क्षिति वाटत नव्हती !

आपल्या वात्सल्याचा वर्षाव तो रोवेनावर करी. रोवेना ही सेड्रिकची मुलगी नव्हती. पण थोर सॅक्सन सम्राट् आल्फ्रेड ह्यांच्या घराण्यांतील

ती असल्यामुळें सेड्रिक तिला अतिशय आदबीनें वागवी. ती तरुण होती आणि तिच्या सौंदर्याचा लौकिक इंग्लंडभर पसरला होता. तेव्हां नादान आणि जुलमी नॉर्मन सरदारांपासून तिचें संरक्षण करणें हें सेड्रिक आपलें आद्यकर्तव्य मानीत असे.

आपल्या ओबडधोबड, दगडी पण भक्कम गढींतील एका मोठ्या दिवाणखान्यांत, त्या दिवशीं संध्याकाळीं सेड्रिक एकटाच बसला होता. सायंकाळच्या जेवणाची वेळ झाली होती तरी तें अजून येत नसल्यामुळें तो अस्वस्थ झाला होता. इतक्यांत कसलातरी गलबला एकदम त्याच्या कानांवर पडला. गढीच्या प्रमुख दरवाजापाशीं बरीच मंडळी जमली होती. सेड्रिकनें आपल्या एका नोकराला चटकन् काय भानगड आहे तें बघून येण्यास पिटाळलें. थोड्याच वेळांत तो परतला.

"जॉर्व्होचे धर्मगुरु आयमर आणि सरदार गिलबर्ट रात्रीपुरता आसरा देण्याची विनंती करीत आहेत. अॅश्बीला जे सामने भरणार आहेत तिकडे निघाले आहेत ते. रात्र पडूं लागली म्हणून आपल्या गढीकडे वळले." त्यानें एका दमांत सांगितलें.

"म्हणजे दोघेही नॉर्मनच !" सेड्रिक स्वतःशींच पुटपुटला. "पण सॅक्सन लोकांचें आदरातिथ्य कसें असतें तें त्यांना दाखवलेंच पाहिजे. जा, त्यांची उतरण्याची व्यवस्था कर" त्यानें नोकराला हुकूम सोडला. "आणि जेवणाची सिद्धता झाली म्हणजे त्यांना इकडे घेऊन या" त्यानें बजावलें.

जॉर्व्होचा धर्मगुरु आयमेर मोठा चैनी आणि रंगेल म्हणून प्रसिद्ध होता. खिस्ताचे सारे नियम त्यानें केव्हांच धाब्यावर बसवले होते. गरिबांकडून ह्या ना त्या मार्गानें पैसे उकळण्यांत त्याचा हातखंडा. गिलबर्ट हा शूर सरदार नुकताच धर्मयुद्धावरून परतला होता. धर्मयुद्धांत शौर्य गाजवल्यामुळें त्याचा मानमरातब वाढला होता. धर्मसंरक्षकांच्या पथकांतील सरदार असल्यामुळें तो स्वतःस धर्मवीर म्हणवून

घेत असे. दरवर्षीं अँश्बी येथें द्वंद्वयुद्धांचे जे सामने होत त्यांत इतर सरदारांना आपण केव्हांच लोळवूं अशी त्याची खात्री होती. म्हणूनच तो मोठा लवाजमा घेऊन तिकडे निघाला होता.

थोड्याच वेळांत हे बडे पाहुणे येत असल्याची ललकारी आली. दागिन्यांनीं मढलेला आयमर आणि भपकेबाज पोशाख केलेला सरदार गिलबर्ट त्यामागोमाग आंत आले. त्यांच्या पाठोपाठ एक साध्या वेषांतील माणूस आंत शिरला. पण त्याच्याकडे फारसें कोणाचें लक्ष गेलें नाहीं. तो सरदार गिलबर्टना वाटेंत भेटला होता आणि त्यानेंच त्यांना सेड्रिकच्या गढीची वाट दाखवली होती. बड्या पाहुण्यांत तो अर्थातच मिसळला नाहीं. सेड्रिकचे इतर आश्रित जेथें बसले होते, त्यांच्यामध्यें तो जाऊन बसला.

सेड्रिकनें अगदीं दरबारी पद्धतीनें पाहुण्यांचें स्वागत केलें आणि त्यांना आपल्या शेजारीं बसवलें. इतक्यांत दिवाणखान्याचें बाजूचें दार उघडून रोवेना आंत आली. नॉर्मन सरदारांच्या देखत तिनें यावें हें सेड्रिकला फारसें पसंत पडलें नाहीं आणि गिलबर्ट ज्या उत्सुकतेनें तिला निरखीत होता तीही त्याला आवडली नाहीं. पण आतां त्याचा निरुपाय होता. रोवेनाला नेहमींप्रमाणें आपल्या उजव्या हातास बसवून घेऊन त्यानें भोजन आणण्यास आपल्या नोकरांना खूण केली.

मेजवानीला सुरवात झाली. जेरुसलेमकडून कांहीं विशेष बातमी आली आहे का याबाबत रोवेना अतिशय उत्सुक होती. तिनें तसें गिलबर्टला विचारूनही पाहिलें. पण आतां युद्ध संपत आलें आहे बहुतेक, एवढीच माहिती तो तिला पुरवूं शकला.

इतक्यांत आणखी कोणी पाहुणा आल्याची वर्दी आली. सेड्रिक थोडा आश्चर्यचकित झाला. पण नवीन पाहुण्यालाही आंत घेऊन येण्यास त्यानें फर्मावलें.

## २ विचारांना खाद्य

नवीन आलेला पाहुणा इझाक नांवाचा ज्यू होता. तो ज्यू होता ही गोष्ट सेड्रिकचा विश्वासू नोकर गर्थ यानें सेड्रिकला मोठ्या गंभीरपणें सांगितली. ह्याचें कारण म्हणजे ख्रिश्चन लोक ज्यूंना नेहमींच तुच्छ लेखीत. एक तर त्यांचा धर्म वेगळा होता आणि दुसरें म्हणजे ज्यू लोक हे ख्रिश्चनांचे पिढीजाद सावकार. बड्या सरदारांनाच काय, पण कित्येक वेळां राजे महाराजांनाही त्यांच्यापुढें पैशासाठीं तोंड वेंगाडावें लागे. ह्याचा अर्थातच त्यांना कमीपणा वाटे. त्यामुळें ते लोक ज्यूंचा मत्सर करीत. ज्यू पैशाचे भारी लोभी. अवाच्या सवा व्याजानें ते ख्रिश्चनांना कर्जें देत; अन् त्यांची फेडही दक्षतेनें करवून घेत.

पण अतिथीला अन्न नाकारायचें नाहीं हा सेड्रिकचा बाणा. त्यामुळें त्यानें इझाकलाही आसरा देऊं केला पायघोळ आंगरखा पांघरलेला, दीन चेहऱ्याचा वृद्ध इझाक दिवाणखान्यांत शिरला आणि सेड्रिकपुढें जाऊन अत्यंत लीनतेनें त्यानें त्याला पुनः पुन्हा वाकून मुजरे केले. पण सेड्रिकनें त्याकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं. त्याच्याकडे आपलें लक्ष आहे असें कोणीच दाखवीत नव्हता. प्रत्येकजण गप्पा मारण्यांत आपण गुंग झालों आहोंत असें भासवीत होता. बिचाऱ्या इझाकनें चौफेर नजर फिरवली. कोणी त्याला बसायला सुद्धा जागा देईल असें मुळींच वाटत नव्हतें. इतक्यांत आयमर आणि गिलबर्ट यांच्याबरोबर आलेल्या त्या तरुणानें त्याला आपल्या जवळ बोलावलें आणि त्याला जागा दिली. बिचारा इझाक अंग चोरून तेथें बसला.

मेजवानी मोठी रंगांत आली होती. युद्धावरच्या रम्य कथा गिलबर्ट रसाळपणें ऐकवत होता आणि रोवेना, सेड्रिक आणि तो तरुण मनुष्यसुद्धा त्या ऐकण्यांत गुंग होऊन गेले होते.

"पण युद्ध आटपत आले कीं नाहीं ?" रोवेनानें मध्येंच उत्सुकतेनें प्रश्न केला.

"अजून नक्की सांगतां येत नाहीं, बाईसाहेब" गिलबर्ट अदबीनें म्हणाला. "पण तुर्क सम्राट् सलादिन लवकरच तहाला तयार होईल असं वाटतं. रिचर्ड महाराज आणि त्यांच्याबरोबर गेलेले शूर सरदार ह्यांनीं उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे."

"खरंच, ह्या सरदारांच्या शौर्याची मला नाहीं वाटत कोणी बरोबरी करूं शकेल" आतांपर्यंत लक्षपूर्वक ऐकत असलेला तो तरुण मध्येंच म्हणाला. "त्यांतल्या त्यांत सहा सरदार तर असे ठरले कीं शिलेदारी मर्दानी सामन्यांत त्यांनीं इतर सर्व आव्हान देणाऱ्यांना केव्हांच हरवलं. मला वाटतं, सरदार गिलबर्ट ह्याबद्दल जास्त माहिती नक्कीच देऊं शकतील" गिलबर्टकडे मोठ्या मिस्किल नजरेनें पहात तो खोचकपणें म्हणाला.

गिलबर्टचा चेहरा लाल झाला होता संतापानें. "नांवं तरी ऐकूं देत ह्या बहाद्दरांची. त्यांत कोणी सॅक्सन होता कीं नाहीं ?" सेड्रिकनें प्रश्न केला. त्या तरुणानें मान डोलावली.

"लीस्टरचा एडमंड पहिला, त्यानंतर जिल्सलॅंडचा टॉमस, सर डॉली तिसरा."

"हा तरी नक्कीच सॅक्सन !" सेड्रिक उद्गारला.

"....चौथा टर्नहॅमचा एड्विन् आणि पांचवा ...? नांव आठवत नाहीं बुवा !"

"अस्सं !" संतापानें लाल झालेला गिलबर्ट त्वेषानें म्हणाला. "मी सांगतों. त्याचें नांव आयव्हॅनो. केवळ गाफील राहिल्यामुळेंच माझ्यावर त्या वेळीं तो मात करूं शकला." गिलबर्टनें अभावितपणें रोवेनाकडे पाहिले. तिच्या चेहऱ्यावरून उत्सुकता नुसती ओसंडून चालली होती.

" पण आतां जरी तो माझ्यापुढें उभा राहिला तरी माझ्या अपमानाचा बदला घ्यायला मी मागें पुढें बघणार नाहीं. " गिलबर्ट इतका संतापला होता कीं तो जाग्यावरून उठून उभा राहिला. " तुम्हां सर्वांच्या समक्ष माझे हें आव्हान आहे. आयव्हॅनोनें माझ्याशीं कोणत्याही प्रकारें युद्ध करण्यास तयार व्हावं." तो तावातावानें ओरडला.

" आयव्हॅनो इथें असता तर तुमचं आव्हान त्यानें नक्कींच स्वीकारलं असतं, सरदारसाहेब " तो तरुण हसून उत्तरला.

" होय, नक्कीच ! " रोवेनानें दुजोरा दिला.

सेड्रिकनें ह्या प्रकाराकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न केला. पण त्याच्या मनांत भावनांचा कोलाहल चालू आहे हें कोणालाही त्याच्या चेहऱ्यावरून कळून चुकलें असतें. तो घाईघाईनें आपल्या जागेवरून उठला. मेजवानी बरखास्त झाली आणि प्रत्येकजण आपापल्या खोलीकडे जाण्यास निघाला.

तो तरुणही दिवाणखान्याबाहेर पडला, आणि त्याला त्याची खोली दाखवणाऱ्या नोकरापाठीमागें चालू लागला. इझाकच्या खोलीशेजारची खोली त्याला देण्यांत आली होती. पण दोनतीन दालनें त्यानें ओलांडलीं असतील नसतील तोंच एका दासीनें त्याला थांबवलें.

" आमच्या बाईसाहेब आपल्याशीं बोलूं इच्छितात " ती म्हणाली.

ती रोवेनाकडून आली आहे हें त्यानें ओळखलें आणि नम्रपणें तिला होकार देऊन तो तिच्या पाठीमागें चालूं लागला. एक छोटा जिना चढून गेल्यावर ते रोवेनाच्या महालांत येऊन पोचले. उत्कृष्ट शृंगारलेल्या त्या महालांत रोवेना आणि तिच्या मैत्रिणी बसल्या होत्या. तो तरुण आंत येतांच रोवेनानें आपल्या मैत्रिणींना जरा दूर जाण्याविषयीं खूण केली. बराच वेळ ती कांहींच बोलली नाहीं. शेवटीं धैर्य करून तिनें विचारलें—

"तरुण माणसा, तुला आयव्हॅनोबद्दल बरीच माहिती आहे ना? मी ती ऐकायला अतिशय उत्सुक आहें."

"मला तशी फारच थोडी माहिती सांगतां येईल." तो नम्रपणें उत्तरला.

"पण युद्ध खरंच संपलं कां? आयव्हॅनो परत यायला निघाला आहे का?"

"होय. तो थोड्याच दिवसांत इंग्लंडला परत येईल. त्यानें जी कीर्ति मिळवली आहे, त्यामुळें त्याला वाटेंत फारसा त्रास होणार नाहीं असं वाटतं." तिला धीर देत तो म्हणाला.

ती पुढें कांहींच बोलली नाहीं. मात्र परततांना तिचे डोळे पाण्यानें भरलेले आहेत हें त्याच्या लक्षांत आल्याशिवाय राहिलें नाहीं. तिच्याकडे एकवार वळून पाहून तो झटकन् त्या महालांतून बाहेर पडला. त्या दासीनें त्याला पूर्वीच्याच जागेवर आणून सोडलें.

"त्या ज्यूची खोली कुठें आहे?" त्यानें स्वतःला मार्ग दाखवणाऱ्या माणसास प्रश्न केला.

"तुमच्या खोलीच्या उजव्या बाजूची खोली."

"आणि गर्थ कुठें असतो?"

"त्याच्याच पलीकडे तो आणि इतर नोकरमंडळी झोपतात."

"अस्सं!" तो तरुण विचारमग्न झाल्यासारखा दिसला. स्वतःची खोली आल्यावर त्यानें आंत शिरून दार लावून घेतलें आणि कपडे वगैरे न बदलतां स्वतःला खोलींतील पलंगावर झोकून दिलें.

❖

# ३ हा तरुण कोण ?

गाढ झोपलेला इझाक कोणाच्या तरी हिसक्यानें एकदम जागा झाला. अजूनही अंधार होता. पक्षी किलबिलाट करीत होते. त्यावरून पहाट झाली असावी असें वाटत होतें. अंधारांत त्याला नीट दिसलें नाहीं. पण कोणीतरी हातांतील दंडुक्यानें टोचून त्याला उठवण्याचा प्रयत्न करीत आहे एवढें त्याच्या लक्षांत आलें.

"ऊठ इझाक, ऊठ ! उजाडायच्या आंत हा किल्ला सोडून गेले पाहिजे तुला." तो मनुष्य म्हणाला.

"कोण...कोण आहेस तूं ?" इझाकनें चाचरत विचारलें.

"तुझा एक मित्र."

"कशावरून ? मी तुझ्यावर विश्वास कसा ठेवूं ?"

"तुला ठेवलाच पाहिजे. तुझ्या आधीं ह्या किल्ल्यांत आलेल्या पाहुण्यांचा तुला पळवून नेऊन कैदेंत ठेवण्याचा बेत मला माहीत आहे."

इझाक चांगलाच दचकला. भीतीनें तो थरथर कांपत होता. आपल्या पैशावर ह्या सरदारांचा डोळा आहे हें त्याला माहीत होतें; आणि त्यासाठीं आपला कितीही छळ करण्यास ते लोक मागेंपुढें पाहणार नाहींत ही त्याची खात्री होती. कसाबसा स्वतःला सांवरत तो म्हातारा उभा राहिला.

"माझ्या पाठोपाठ–लवकर !" किंचित् हुकुमी आवाजांत तो मनुष्य म्हणाला, आणि स्वतः चालूं लागला. इझाकच्या शेजारच्या खोलींत जाऊन त्यानें आंतल्या माणसाला उठवलें.

"ऊठ, गर्थ !" त्याचा आवाज अधिक करडा झाला होता. "मागचा दरवाजा खोलून दे. मला अन् ह्या ज्यूला लवकर बाहेर पडायचं आहे."

" इतक्या लवकर दरवाजा उघडण्याचा हुकूम नाहीं " आळसटपणें गर्थ उत्तरला. पण हें उत्तर जणूं ह्या माणसाला अपेक्षितच होतें. तो झटकन् खालीं वाकला आणि गर्थच्या कानांत कांहींतरी पुटपुटला. जणूं कांहीं विजेचा धक्का बसावा त्याप्रमाणें गर्थ चटकन् उठला. आपल्या-बरोबर त्या दोघांना किल्ल्याच्या मागील बाजूस घेऊन गेला आणि त्यांना बसण्यासाठीं दोन घोडेही त्यानें त्यांच्यापुढें आणून उभे केलें.

किल्ल्यांतील इतर नोकरांच्या ही गोष्ट ध्यानांत आल्याशिवाय राहिली नाहीं. त्यांतल्या त्यांत सेड्रिकचा खुशमस्कऱ्या वाम्बा त्याला राहवलें नाहीं. " काय, करतो आहेस काय–तूं हें ?" तो गर्थला ओरडला. पण त्याच्याकडे पाहून डोळा मिचकावण्यापलीकडे गर्थनें त्याला उत्तर दिलें नाहीं. " आणि हें बघ गर्थ....! " तो मनुष्य एकदम गर्थला म्हणाला. गर्थ त्याच्याजवळ जातांच त्यानें पुन्हा कांहींतरी गर्थच्या कानांत सांगितलें. गर्थनें मान डोलावली आणि तो मनुष्य घोड्यावर स्वार होत असतांना लवून त्याला मुजरा ठोकला.

हा मनुष्य म्हणजे आयमर आणि गिलबर्ट ह्यांच्याबरोबर आलेला तरुण मनुष्य होता हें तुम्हीं आतांपर्यंत ओळखलें असेलच. सेड्रिकच्या किल्ल्यांतून बाहेर पडल्यावर थोड्याच वेळांत त्या दोघांना जंगल लागलें. पण जंगलांतील प्रत्येक पायवाट जणूं कांहीं त्या तरुणाला तोंडपाठ होती. पहाटेच्या अंधुक प्रकाशांत अनेक वेडीं-वाकडीं वळणें घेत तो घोडें दामटीत होता.

इझाकला प्रथम त्या तरुणाचा संशयच येत होता. पण हळूहळू तो प्रामाणिक आहे हें त्याला पटूं लागलें. तो आपल्याला कां मदत करीत आहे हें अजून त्याला समजलें नव्हतें. पण एकूण त्या तरुणाविषयीं त्याला कृतज्ञता वाटूं लागली होती.

बराच वेळ चालल्यानंतर एकदम त्या तरुणानें आपला घोडा थांबवला.

"आतां मला तुझा निरोप घेतला पाहिजे, इझाक" तो म्हणाला,

"पण मी एकटाच कुठें जाणार ?" इझाक थोडासा बावरूनच उद्गारला. "मला हा प्रदेश माहीत नाहीं आणि स्वतःचं संरक्षण करण्याइतकं बळही माझ्याजवळ नाहीं."

"त्याची तुला नको काळजी. इथून जवळच शेफील्ड गांव लागेल. तिथपर्यंत मी तुला पोचवतों. तिथें तूं आपल्या जातभाईंकडे उतरूं शकशील."

आतां व्यवस्थित दिसूं लागलें होतें. इझाकला प्रथमच आपल्या उपकारकर्त्याचा चेहरा पाहण्यास सांपडला. इझाकनें त्याला बारकाईनें न्याहाळलें. त्याच्या मुरब्बी नजरेंतून कांहीं गोष्टी निसटल्या नाहींत.

"तरुण माणसा, तूं माझ्यावर केलेले उपकार मी कधींही विसरणार नाहीं" इझाक कांहींसा गहिंवरून म्हणाला. "तूं केलेल्या उपकाराची परतफेड करण्याचा मीं निश्चय केलेला आहे."

"मी आहे एक साधा यात्रिक!" तो तरुण कांहींशा बेफिकिरीनें उत्तरला. "तुझं सोनं किंवा पैसा ह्याचा मला कांहीं उपयोग नाहीं."

"तुला कशाचा जास्त उपयोग आहे, हें मला जास्त कळतं आहे, पोरा!" त्याच्याकडे पहात इझाक चाणाक्षपणानें म्हणाला. तात्काळ त्या तरुणाच्या चेहऱ्यावर संशयाची छटा उमटली. "तुला एक भरभक्कम चिलखत, धारदार तलवार आणि उमदा घोडा ह्यांची जास्त जरूरी आहे." इझाक पुढें म्हणाला, "मी देतों तो कागद तूं लीस्टर शहरांतल्या करजाथ जयराम ह्या व्यापाऱ्याला दाखवलास तर तो तुला हें सगळें देईल. आणि मी जरी ज्यू असलों ना, तरी तुझ्याकडून

किंमतीची अपेक्षा करीत नाहीं मी. तो जें देईल तें तूं स्वतःचं समज" इझाकनें बजावलें.

इझाक बोलत असतांना कांहीं वेळ त्या तरुणाच्या चेहऱ्यावर अनिच्छा दिसली. पण नंतर मात्र तो हसला; आणि त्यानें इझाकच्या हातांतून तो कागद घेतला. त्यावर हिब्रू भाषेंतील अक्षरें लिहिलीं होतीं.

"आणखी कांहीं, इझाक?" त्यानें मिस्किलपणें विचारलें.

"जरा जपूनच, तरुण माणसा! फार उतावळेपणा धोकादायक असतो" इझाकनें त्याला इशारा दिला.

त्या तरुणानें उत्तरादाखल एकदा हसून इझाककडे बघितलें आणि त्यांनीं एकमेकांचा निरोप घेतला.

# ४ शिलेदारी सामने

अॅश्बी गांवापासून सुमारें मैलभर अंतरावर दाट जंगलाच्या सीमेला लागून, एक हिरवेंगार, सपाट विस्तीर्ण मैदान पसरलें होतें. त्याच्या पूर्वेस जंगलाची सीमा भिडली होती तर पश्चिमेस भव्य ओक वृक्षांची एक मोठी राई पसरली होती.

ह्याच मैदानांत, अॅश्बी गांव ज्याकरितां प्रसिद्ध होतें त्या शिलेदारी सामन्यांच्या दंगली भरत असत. पटांगणांत प्रवेश करण्यासाठीं उत्तर व दक्षिण बाजूला दोन लाकडी प्रवेशद्वारें बसवलीं होतीं. त्यांतून प्रतिस्पर्धी घोडेस्वार मैदानांत उतरत असत. मैदानाच्या बाजू प्रेक्षकांना बसण्यासाठीं मुद्दाम उतरत्या करण्यांत आल्या होत्या. प्रवेशद्वारांच्या दोन्ही बाजूंस सरदार-दरकदार ह्यांच्यासाठीं खास शामियाने उभारण्यांत आले होते. प्रत्येक सरदाराच्या निशाणाचा रंग वेगळा होता, आणि त्याच रंगाच्या कापडानें त्याचा शामियाना सजवण्यांत आला होता. मध्यभागीं राजासाठीं अतिशय उत्कृष्ट सजवलेला शामियाना उभारण्यांत आला होता. राजाच्या उजव्या हाताला गिल्बर्टचें निशाण डौलांत फडकत होतें. शिलेदारी सामन्यांतील त्याच्या नैपुण्याबद्दल त्याला ही खास मानाची जागा दिलेली होती. तो स्वतः आणि त्याच्या बरोबरीचे इतर चार सरदार ह्यांनीं आज इंग्लंडमधील कोणत्याही सरदाराशीं आपण खेळण्यास तयार आहों असें आव्हान दिलें होतें. अर्थात् ह्या पांचांना प्रतिस्पर्धी संघ कोण आहे हें अजून समजलें नव्हतें.

सकाळपासूनच लोकांचे घोळके मैदानांत गर्दी करूं लागले. चकचकीत पोलादी चिलखतें घातलेले शिपाई त्यांना व्यवस्थित बसण्यास मदत करीत होते. जिकडे तिकडे गलबलाट चालू होता. त्यांतूनच एखादा विशेष प्रसिद्ध सरदार आपल्या लवाजम्यासह आंत आला म्हणजे त्याला पाहण्यासाठीं प्रेक्षक गडबड करीत. सामान्य

प्रेक्षकांना त्यांच्या जागांवर मुकाट्यानें बसवणें सोपें होतें. कोणी कोठें बसावें ह्याबाबत त्यांच्यांत फारसे मतभेद होत नसत. बड्या मानकऱ्यांत मात्र हीं भांडणें नेहमींचीं. ज्याच्या त्याच्या मानाप्रमाणें ज्याची त्याची जागा ठरवून दिलेली असे; पण तरीही भांडणें होत आणि मग राजाला तंटा मिटवावा लागे.

ह्या सगळ्या गर्दींत अन् रेटारेटींत एक म्हातारा मनुष्य मात्र इतरांचे शिव्याशाप सहन करूनही पुढें पुढें जाण्यास धडपडत होता. तो इझाक होता. आतां त्याचा जाडाभरडा वेष पार बदलला होता. अत्यंत भरजरी आंगरखा त्यानें परिधान केला होता. त्याच्या हातावर रेलून उंची वस्त्रें नेसलेली एक अत्यंत सुंदर तरुणी चालत होती. ती त्याची मुलगी होती. रिबेक्का तिचें नांव. बिचारी ह्या रेटारेटींत बावरून गेली होती. पण अशा प्रकारच्या उत्सवप्रसंगीं किंवा सामन्यांच्या वेळीं ज्यूंना फारसें भीति वाळगण्याचें कारण नसे. एकमेकांचा मत्सर करणारे अनेक सरदार तेथें उपस्थित असत. प्रतिपक्षांतील कोणी ज्यूंना त्रास देतो आहे असें कळलें कीं त्यांना मोठा कळवळा येत असे! ज्यूंचें मात्र अशा रीतीनें परभारें संरक्षण होत असे. फारसें कोणी त्यांच्या वाटेला अशा वेळीं जात नसे.

धक्काबुक्की करून, अनेक हिकमती लढवून इझाकनें खूप वरची जागा मिळवण्याचा प्रयत्न चालवला होता. इतक्यांत राजा जॉन आल्याची वर्दी आली. एका अत्यंत उत्कृष्ट शृंगारलेल्या घोड्यावर स्वार झालेला जॉन आपल्या लवाजम्यासकट मैदानांत आला. त्याच्या पाठोपाठ भरजरी मखमली, पायघोळ अंगरखा घातलेला धर्मगुरु आयमर होता. जॉन आंत आला तरी इझाकची धडपड चालूच होती. जॉनचें लक्ष तात्काळ त्याच्याकडे गेल्याशिवाय राहिलें नाहीं. गोंधळून गेल्यामुळें, घाबरल्यामुळें अधिकच सुंदर दिसणारी रिबेक्काही त्याच्या नजरेंतून सुटली नाहीं.

जॉनला लगेच इझाकचा पुळका आला. त्या धनवान् ज्यूचा पुढेंमागें आपल्याला उपयोग झाल्याशिवाय राहणार नाहीं हें त्यानें जाणलेंच होतें! त्यानें तात्काळ एका सरदाराला त्याच्या जागेवरून उठण्यास फर्मावलें आणि त्याची जागा इझाकला दिली. तो सरदार अपमानित झाल्यामुळें संतापानें लाल झाला. पण त्याचा इलाज नव्हता. तो सॅक्सन होता. त्याचें नांव अॅथलस्टेन. पण त्याच्यापेक्षांही त्याच्या पलीकडे बसलेली व्यक्ति इतकी चिडली होती कीं तिचा हात तात्काळ तलवारीकडे गेला. तो सेड्रिक होता! त्यानें अॅथलस्टेनला जाग्यावरच बसण्यास खूण केली.

आपली आज्ञा पाळली जात नाहीं हें पाहून जॉन भयंकर चिडला.

"मी पाहतोंच कोण त्या ज्यूला जागा देत नाहीं!" तो त्वेषानें ओरडला.

हा गंभीर पेचप्रसंग वाम्बामुळें टळला. त्यानें चटकन् आपली जागा इझाकला देऊं केली.

नंतर जॉन स्थानापन्न झाला एकदाचा, आणि झिरमिळ्या बांधलेलें शिंग फुंकून ललकाऱ्यानें सर्वांस शांत केलें. कर्णकर्कश आवाजांत त्यानें स्पर्धांचे नियम वाचून दाखवले.

प्रथम गिलबर्टच्या नेतृत्वाखालीं असणाऱ्या सरदारांनीं जें आव्हान दिलें होतें, तें स्वीकारण्यास जे पुढें येतील त्यांचे सामने होणार होते. नंतर प्रत्येकाला आपल्या तोलाचा गडी निवडून त्याच्याशीं लढण्याची मुभा मिळणार होती. ह्या दोन्हींमध्यें जो उत्कृष्ट ठरेल आणि जास्तींत जास्त प्रतिस्पर्ध्यांना लोळवील, त्याला सर्वोच्च मान खास जॉनच्या हस्तें देण्यांत येणार होता.

दुसऱ्या दिवशीं खुले सामने होणार होते. कोणाही शिलेदारास

किंवा सरदारास त्यांत भाग घेण्याची मुभा होती. त्यांतही जो विजेता ठरेल त्याला सर्वोत्कृष्ट शिलेदार म्हणून मुकुट अर्पण केला जाणार होता. त्यानंतर तिरंदाजीच्या स्पर्धा होत्या. निष्णात दरबारी तिरंदाजांशीं इतरांना टक्कर खावी लागणार होती.

नंतर टाळ्यांच्या गजरांत, नखशिखान्त पोलादी चिलखत परिधान केलेले प्रतिस्पर्धी सावकाश, ऐटींत मैदानावर पुढें आले. गिलबर्टच्या पथकालासुद्धा टक्कर देण्यास पांच वीर पुढें आलेले पाहून प्रेक्षकांनी मोठा आरडाओरडा करून आणि टाळ्या वाजवून आपली पसंती व्यक्त केली. प्रत्येकानें आपला जोडीदार ठरवला आणि ते उत्तर–दक्षिण टोकांना जाऊन उभे राहिले.

सगळीकडे टाचणी पडली तर ऐकूं येईल अशी शांतता पसरली. पुन्हा एकदा शिंगाचा कानठळ्या बसवणारा आवाज झाला आणि दुसऱ्या क्षणीं प्रतिस्पर्ध्यांनीं प्रचंड वेगानें घोडे दौडवीत एकमेकांवर चाल केली. जिकडे तिकडे एकदम धुळीचे लोट उडाले. क्षणभर कांहींही दिसेनासें झालें. धूळ जरा बसल्यावर लोकांनीं पाहिलें तर गिलबर्ट आणि त्याचे दोन साथीदार रेजिनाल्ड आणि मॅलव्होझिन यांनीं आपल्या प्रतिस्पर्ध्यांना घोड्यावरून खालीं पाडलें होतें. उरलेल्या दोघांपैकीं एकाच्या प्रतिस्पर्ध्याचा घोडा भडकून सैरावैरा धावत सुटल्यामुळें त्यांस बाद ठरवण्यांत आलें, आणि दोघांची बरोबरी झाली. गिलबर्टचें पथक विजयी ठरलें होतें. नियमाप्रमाणें हरलेल्यांचे घोडे आणि आयुधें विजेत्यांना बक्षिस मिळालीं.

त्यानंतर दुसऱ्यांदा, तिसऱ्यांदा इतर सरदारांनीं प्रयत्न केले; पण गिलबर्टच्या पथकालाच विजय मिळत गेला. प्रेक्षकांत निराशा पसरली. गिलबर्टच्या पथकाविरुद्ध उभा राहण्यास कोणी तयार होईल असें आतां वाटत नव्हतें. जॉन सुद्धा पांचांपैकीं विजेतेपद कोणाला द्यायचें

हें आपल्या सल्लागारांबरोबर ठरवूं लागला. विजयश्रीची माळ गिलबर्ट-च्या गळ्यांत पडणार याबाबत कोणाला संशय उरला नव्हता. कारण त्यानें आपल्या सर्व प्रतिस्पर्ध्यांना घोड्यावरून पार फेकून दिलें होते.

पण पुन्हा एकदां शिंग वाजलें आणि सर्वांचे डोळे तात्काळ तिकडे वळले. संपूर्ण पोलादी काळेंकभिन्न चिलखत चढवलेला एक शिलेदार मोठ्या दिमाखानें पुढें आला. त्याचा चेहरा पूर्ण झाकलेला होता, त्याच्या छातीवर आणि ढालीवर कोरलेलें चिन्ह पूर्णपणें अनोळखी होतें. तो एकदाच पुढें सर-सावला होता. त्याच्याबरोबर कोणी नोकरचाकर, इतर लवाजमा असावा असें वाटत नव्हतें. "हा कोण असावा बुवा?" प्रेक्षकांत अनेक तर्कवितर्क चालू झाले. कित्येकांनीं तर चक्क त्याला अनोळखी,



अपरिचित, बेवारशी म्हणून संबोधायला सुरवात केली. सर्वांनाच

त्याचें फार कौतुक वाटलें. अनेकांनीं त्याला, कोणाला आव्हान द्यावें ह्याविषयीं प्रेमळ सूचनाही केल्या.

ऐटबाज पावलें टाकीत त्यानें आपला घोडा मध्यभागीं आणला आणि गिलबर्टच्या विजयी पथकाकडे नजर टाकली. तो कोणाला आव्हान देतो ह्याविषयीं प्रेक्षकांमध्यें दांडगें औत्सुक्य होतें. आणि जेव्हां त्यानें खुद्द गिलबर्टला आव्हान दिलेलें लोकांनीं पाहिलें तेव्हां सर्व अतिशय चकित झाले. खुद्द गिलबर्टलाही आश्चर्य वाटलें. त्यानें सावधगिरी म्हणून नवीन तलवार परजली आणि ताज्या दमाचा घोडा घेतला.

आपल्या घोड्याला वळवून गिलबर्टचा प्रतिस्पर्धी उत्तर द्वारापाशीं खडा झाला. दक्षिण द्वारापाशीं थोड्याच वेळांत नवीन भाला आणि ढाल घेऊन गिलबर्टही सज्ज झाला. शिंगाचा आवाज विरतो न विरतो तोंच दोघांही प्रतिस्पर्ध्यांनीं विद्युद्वेगानें एकमेकांवर चाल केली. शस्त्रांचा प्रचंड आवाज झालेला लोकांनीं ऐकला. दोघांचेही घोडे मागील पायांवर उभे राहिलेले त्यांनीं पाहिलें. दोघांचेही भाले पार मोडून गेले होते. एकमेकांकडे क्रुद्ध कटाक्ष टाकून दोघांनींही नवीन भाले आणण्यासाठीं विरुद्ध बाजूस कूच केलें.

दोघांनाही दम खाण्यास थोडा वेळ देण्यांत आला. प्रेक्षक मात्र ह्या अनोख्या शिलेदारावर बेहद खूष होते आणि आरोळ्या ठोकून त्याला उत्तेजन देत होते.

इतक्यांत जॉननें पुन्हा शिंग वाजवण्यासाठीं खूण केली आणि सगळीकडे चिडिच्चिप झालें. या वेळेस गिलबर्टनें मोठ्या कौशल्यानें आपल्या प्रतिस्पर्ध्याच्या ढालीवर एवढा प्रचंड आघात केला कीं त्याचा भाला तर मोडलाच, पण तो अनोळखी सरदार घोड्यावरून इतका कलला

कीं लोकांना वाटलें तो पडला. पण चटकन् स्वतःला सावरून घेऊन त्यानें गिलबर्टच्या शिरस्त्राणावर जोराचा टोला हाणला. हा हल्ला इतका अनपेक्षित होता कीं दुसऱ्या क्षणीं घोडा आणि घोडेस्वार धुळींत कोसळले.

गिलबर्टला हा अपमान सहन होणें शक्य नव्हतें. त्यानें चटकन् आपल्याला सांवरून घेतलें आणि तलवार उपसली. त्याच्या प्रतिस्पर्ध्यानेंही घोड्यावरून उडी घेतली आणि तलवार परजून तो पुढें धावला. पण राजाचे संरक्षक मध्यें पडले आणि त्यांनीं गिलबर्टला त्याच्या तंबूकडे हलवलें.



विजेत्यानें आपल्या कमरेचें शिंग काढलें आणि मोठ्या ऐटींत फुंकलें. कोणींही त्याचें आव्हान स्वीकारावें असा त्याचा अर्थ होता. प्रथम भल्या दांडग्या शरीराच्या रेजिनाल्डनें तें स्वीकारलें. पण त्यानें जरी आपल्या प्रतिस्पर्ध्याचा भाला मोडला तरी स्वतःचा तोल त्याला सावरतां आला नाहीं. फिलिप मॅल्व्होझिनला त्या अनोळखी सरदारानें सहज लोळवलें आणि चौथ्या प्रतिस्पर्ध्याचें शिरस्त्राण उडवून देऊन त्याचाही पराभव केला.

अनोखा सरदार हा सर्वोत्कृष्ट शिलेदार ठरला होता.

# ५ बक्षिशी !

स्पर्धेचा जो निर्णय लागला होता, तो जॉनला मुळींच पसंत नव्हता. गिलबर्टसारख्याला लोळवणारा हा जबरदस्त इसम कोण असावा ह्याचा तो विचार करीत होता. इतरांनाही त्याबद्दल भयंकर कुतूहल होतें. पण त्या शिलेदारानें चेहरा झाकणारें आपलें शिरस्त्राण काढण्यास स्पष्ट नकार दिला. ही त्याची उद्धट वागणूकही जॉनला पसंत नव्हती. मोठ्या नाइलाजानेंच त्याच्या शामियान्यापुढें तो अनोखा वीर जेव्हां इतमामानें खडा राहिला, तेव्हां त्याच्या भाल्याच्या टोकावर त्यानें मोठ्या नाखुषीनें विजेतेपदाची माळ ठेवली.

सगळीकडे टाळ्यांचा कडकडाट झाला. प्रेक्षकांनीं आरडून ओरडून मैदान डोक्यावर घेतलें. गिलबर्ट आणि त्याचे गर्विष्ठ साथीदार ह्यांची खोड मोडल्याबद्दल प्रेक्षक त्या अनोळखी शिलेदारावर निहायत खूष होते. तो पुढें काय करतो इकडे सर्वांचें लक्ष लागून राहिलें होतें. कारण त्या काळच्या चालीप्रमाणें विजेता ज्या युवतीला ती माळ अर्पण करील ती सर्वांत सुंदर समजली जाणार होती. हा मान कोणाला मिळतो ह्याबद्दल लोकांना अतिशय उत्सुकता वाटत होती.

आपल्या भाल्याच्या टोकावर ती माळ कौशल्यानें संभाळीत विजयी शिलेदारानें शाही शामियान्याच्या डाव्या बाजूला आपला घोडा वळवला. थोड्याच वेळांत एका शामियान्यापुढें तो निश्चल उभा राहिला. सगळ्यांची उत्सुकता कळसास पोचली होती. हळूहळू आपला भाला खालीं करीत त्यानें ती माळ एका तरुणीच्या पायांपाशीं टाकली. जिकडे तिकडे शिंगांचा आणि तुताऱ्यांचा निनाद झाला. प्रत्येकजण

वाकून वाकून त्या तरुणीला पाहण्याचा प्रयत्न करीत होता. ती रोवेना होती !

विजेत्या शिलेदाराची ही निवड देखील जॉनला पसंत पडली नाहीं. त्यांत पुन्हा रोवेना सॅक्सन होती, नॉर्मन नव्हती हें कारणही होतेंच. पण स्पर्धेच्या नियमाप्रमाणें त्याला ती निवड मान्य करण्यावांचून गत्यंतर नव्हतें. रीतीप्रमाणें रात्रीं स्पर्धकांच्या सन्मानार्थ राजेसाहेबांकडे मोठी मेजवानी झडणार होती. त्या मेजवानीस हजर राहण्याचें आमंत्रण मोठ्या समारंभानें जॉननें रोवेनास आणि त्या अनोळख्या शिलेदारास दिलें. पण रोवेनानें नॉर्मन सरदारांच्या घोळक्यांत मिसळावें ही गोष्ट सेड्रिकला मुळींच रुचली नाहीं. रोवेनाच्या वतीनें त्यानें तें निमंत्रण नाकारलें. त्या सरदारानेंही, उद्यांच्या खुल्या सामन्यांच्या तयारीसाठीं वेळ हवा ह्या सबबीवर मेजवानीस हजर राहण्यास नम्रतापूर्वक नकार दिला. खुद्द राजानें दिलेलें आमंत्रण नाकारलें जातें ही गोष्ट जॉनला अनपेक्षित होती. दोघांकडे क्रुद्ध कटाक्ष टाकून जॉन आपल्या मानकऱ्यांसमवेत निघून गेला.

पहिल्या दिवशींच्या कार्यक्रमाची समाप्ति झाली होती.

इतरांबरोबर त्या अनोळख्या शिलेदारानेंही आपल्या तंबूची वाट धरली. त्याला पाहण्यासाठीं त्याच्या तंबूपाशीं खूप गर्दी जमली होती. कित्येकांनीं स्वतः पुढें होऊन सेवेची तयारी दर्शवली. पण त्यानें त्यांना नकार दिला. जमलेल्या लोकांना अभिवादन करून तो सरळ तंबूंत शिरला. आंत त्याचा जो नोकर होता तोही बुरखाधारीच होता. त्यानें लगबग करून आपल्या धन्याला चिलखत वगैरे उतरण्यास मदत केली; आणि जेवण त्याच्यापुढें ठेवलें.

त्याचें जेवण होत आलें असेल नसेल तोंच त्याला भेटण्यासाठीं कांहीं शिलेदार आले आहेत अशी नोकरानें वर्दी दिली. स्पर्धेच्या

नियमाप्रमाणें विजेत्याला हरलेल्यांची आयुधें आणि घोडा अर्पण करीत असत. त्यानुसार आपल्या शिलेदारानें ज्यांचा पराभव केला होता अशांचे नोकर घोडे आणि शस्त्रें अर्पण करण्यासाठीं आले होते. पण अनोळख्या सरदारानें त्यांचा स्वीकार केला नाहीं. उलट त्या नोकरांनाच त्या वस्तू त्यानें बक्षीस देऊन टाकल्या. ते अर्थात् खूश होऊन निघून गेले.

" गर्थ, आतांपर्यंतचा तरी कार्यक्रम व्यवस्थित पार पडला. " आपल्या नोकराला उद्देशून सरदारसाहेब म्हणाले. गर्थनें नम्रतेनें मान लववली.

" आतां फक्त एक काम राहिलं बघ. मी देतों ती रक्कम घेऊन गांवांत जायचं आणि इझाकला शोधून काढून त्याला ती देऊन टाकायची. तो कांहीं म्हणाला असला तरी मला योग्य ती किंमत दिलीच पाहिजे. "

आपल्या मालकाला एकटाच सोडून गर्थ ह्या नव्या कामगिरीवर उत्साहानें निघाला. त्याला ॲश्बी गांवाची खडान् खडा माहिती होती. त्यामुळें तो ज्यू कुठें उतरला असावा ह्याचा त्याला पूर्ण अंदाज होता. जरा चौकशी केल्यावर त्याला तो वाडा सांपडला आणि एका काळ्या कभिन्न हबशी गुलामानें त्याला इझाक ज्या खोलींत होता तिथें आणून सोडलें. खोलींत रिबेक्का आणि इझाक ह्या दोघांशिवाय तिसरें कोणी नव्हतें. इझाक संतापलेला दिसत होता आणि जळफळत खोलींत येरझारा घालीत होता. जॉननें त्याच्याकडे बऱ्याच मोठ्या कर्जाची मागणी केली होती आणि पैसे दिल्याशिवाय इझाकची सुटका नव्हती !

गर्थनें आपण कशासाठीं आलों आहोंत तें शक्य तितक्या ऐटींत सांगण्याचा प्रयत्न केला.

" मीं म्हटलं नाहीं, तो पोरगा प्रामाणिक आहे ? " इझाक रिबेनकाकडे वळून म्हणाला. पैसे पाहिल्यावर त्याचा राग ओसरलेला

दिसत होता. गर्थच्या मालकाला आपण तो घोडा आणि शस्त्रें भेट दिलीं होतीं हें तो केव्हांच विसरून गेला होता. गर्थनें आणलेल्या नाण्यांवर त्यानें तात्काळ झडप घातली. मात्र गर्थजवळ त्याच्या धन्याची तोंड भरून स्तुति करण्यास तो विसरला नाहीं.

आपलें काम झाल्यावर गर्थ तेथून परत फिरला. पण त्या वाड्यांतून बाहेर पडण्याचा रस्ता आपल्याला सांपडेल कीं नाहीं ह्याची त्याला शंकाच होती. कारण तो हबशी आतां गायब झाला होता. आपण कसे आलों हें आठवण्याचा प्रयत्न करीत तो अंधारांतून चालला होता.

इतक्यांत काळ्याकुट्ट अंधारांतून एक पांढरी आकृति आपल्याला बोलावीत आहे असें त्याला दिसलें. जावें कीं न जावें ह्याचा त्याला कांहीं वेळ संभ्रम पडला. पण शेवटीं त्यानें तो आदेश मानण्याचें ठरवलें. जवळ जातांच ती व्यक्ति रिबेक्का आहे हें त्याच्या लक्षांत आलें.

"माझ्या वडिलांनीं तुझ्याकडून ऐंशी मोहरा घेतल्या ना ?" तिनें विचारलें. "खरं म्हणजे त्यांनीं कांहींच घ्यायला नको होतं. तुझ्या मालकाला त्यांनीं ती भेट दिली होती."

गर्थला काय बोलावें हें सुचेना.

"हें बघ, हें घे." गर्थच्या हातांत एक थैली खुपशीत ती म्हणाली. "ह्यांत तुला शंभर नाणीं सांपडतील. ऐंशी तुझ्या मालकासाठीं आणि बाकीची तुझ्यासाठीं. आतां थांबू नकोस. लवकर जा. रस्ते धोक्याचे झाले आहेत." एवढा इशारा देऊन ती घाईघाईनें परत फिरली आणि अंधारांत अदृश्य झाली.

अनपेक्षितपणें मिळालेल्या ह्या बक्षिशीनें खूष होऊन गर्थ मोठ्या लगबगीनें त्या वाड्याबाहेर पडला.

*

# ६ बुरखा काढला

सामन्यांचा दुसरा दिवस उजाडला. आज खुले सामने होणार होते. त्यांत भाग घेणाऱ्या शिलेदारांचे दोन संघ पाडण्यांत आले होते. पहिल्या पथकाचें नेतृत्व करण्याचा मान आपल्या अनोळख्या शिलेदाराला मिळाला होता. आणि दुसऱ्या संघाचें नेतृत्व गिलबर्टकडे होतें.

सकाळीं दहाच्या सुमारास पटांगण प्रेक्षकांनीं फुलून गेलें. आजच्या सामन्यांत जो अजिंक्य ठरेल त्याला रोवेनाच्या हस्तें सुवर्णमुकुट बहाल केला जाणार होता. रोवेनासाठीं खास सुशोभित उच्चासन तयार करण्यांत आलें होतें. तिच्या शेजारींच सेड्रिक बसला होता. मात्र सेड्रिकचा उजवा हात कॉनिंग्जबर्गचा सरदार ॲथलस्टेन मात्र तेथें नव्हता. त्यानें सामन्यांत भाग घेण्याचें ठरवलें होतें. मात्र तो अनोळख्या शिलेदाराच्या विरुद्ध पक्षांत सामील झाला होता.



रोवेना आपल्या जागेवर निराजमान होतांच ललकाऱ्यांनीं तुताऱ्या फुंकून सर्वांना शांत राहण्याविषयीं इशारा दिला. तात्काळ दोन्ही नायकांनीं आपापलीं पथकें दोन रांगांत समोरासमोर आणून उभीं केली आणि जॉनला सलामी दिली. जॉनच्या हातांत एक रत्नजडित मुठीची छडी होती. ती छडी आडवी धरली कीं सामना थांबवावा असा त्याचा अर्थ होता. गोष्टी फार निकरावर जाऊन रक्तपात अथवा मृत्यु होऊं नये म्हणून ही दक्षता घेण्यांत आली होती. फक्त जॉन राजालाच अशा प्रकारें सामना थांबवण्याचा अधिकार होता.

सलामी होतांच दोन्ही पथकांतील आघाडीचे वीर एकमेकांसमोर येऊन उभे राहिले. अगदीं आयत्या वेळेस अनोख्या सरदाराच्या पथकांत एका विचित्र सरदारस्वारीची भर पडली होती. काळ्या घोड्यावर, संपूर्ण काळा पोशाख घालून बसलेली ही स्वारी मोठी विचित्र दिसत होती. त्यांत भर म्हणजे स्वारीनें बुरखाही पांघरला होता "नांव काय ?" विचारतांच "मला लोक काळा सरदार म्हणतात" म्हणून त्यानें चक्क ठोकून दिलें. त्याची स्पर्धकांच्या 'राखीव' दलांत निवड झाली.

आघाडीचे वीर एकमेकांसमोर येऊन खडे राहतांच पुन्हा शिंग वाजलें आणि प्रचंड गर्जना करीत प्रतिस्पर्धी एकमेकांवर तुटून पडले. धूळ इतकी उडाली कीं कांहीं वेळ मुळींच कांहीं दिसेना. धूळ जरा कमी झाल्यावर दिसलें कीं दोन्ही बाजूचे निम्मे लोक घोड्यावरून कोसळले आहेत! जे कोसळल्यामुळें बेशुद्ध पडले नव्हते, त्यांनीं झटकन् उठून तलवार उपसून आपल्या शत्रूंवर धाव घेतली होती. जे जखमी झाले ते त्या गर्दींतून बाहेर पडण्यासाठीं वाट शोधीत होते.

इतक्यांत पुन्हा शिंग वाजलें आणि दोन्ही बाजूचे राखीव वीर त्या गोंधळांत घुसले. शस्त्रांच्या खणखणाटानें साऱ्या दिशा जणूं कोंदून गेल्या. प्रेक्षकांचे डोळे अर्थातच दोन्ही बाजूंच्या नायकांना

शोधीत होते. त्या गर्दीत एकमेकांना भिडण्याची त्यांनीं शिकस्त केली. पण बराच वेळ ते समोरासमोर येऊंच शकले नाहींत. लढवय्यांची संख्या जेव्हां बरीच कमी झाली तेव्हां मात्र त्यांना तशी संधि मिळाली. त्वेषानें गर्जना करीत दोघेही एकमेकांवर तुटून पडले.

पण ह्या वेळेस अनोळख्या शिलेदाराच्या पथकाची अवस्था अतिशय वाईट झाली होती. त्यांतले बहुतेक शिलेदार गळाले होते. गिलबर्टच्या लक्षांत ही गोष्ट येण्यास वेळ लागला नाहीं. त्यानें चटकन् खूण करून आपल्या बाजूच्या लोकांना बोलावलें. रेजिनाल्ड आणि ॲथलस्टेन लगेच त्या बाजूला वळले आणि तिघांनीं मिळून आपल्या प्रतिस्पर्ध्यांवर हल्ला चढवला.

अनोळख्या शिलेदारानें प्रसंग ओळखून तिघांनाही तोंड देण्याचें ठरवलें. त्याचा घोडा इतका चपळ होता कीं त्याच्या मदतीनें बराच वेळ तो त्यांना झुंजवत ठेवूं शकला.

प्रेक्षकांना आतां मात्र काळजी वाटूं लागली. कारण तिघांशीं झुंज खेळणारा तो शूर वीर हळूहळू थकत चालला होता. टाळ्या पिटून, आरोळ्या ठोकून ते त्याला शक्य तितकें उत्तेजन देण्याचा प्रयत्न करीत होते.

त्याची ही केविलवाणी स्थिति एका माणसाच्या नजरेतून मात्र सुटली नव्हती. तो माणूस म्हणजे आपला विक्षिप्त काळा सरदार. आतांपर्यंत त्यानें ह्या रणधुमाळींत मुळीं फारसा भागच घेतला नव्हता. अर्थात् ज्यांनीं ज्यांनीं त्याच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला त्यांना त्यानें पळवून लावलें हें खरें असलें, तरी त्यानें आपण होऊन स्वत: उत्साहानें कोणाचाच पाठलाग केला नव्हता किंवा कोणावर हल्लाही केला नव्हता.


पण ही आणीबाणीची परिस्थिति पाहतांच त्याची ती निष्क्रियता कोठल्या कोठें पळाली. प्रचंड गर्जना करीत त्यानें आपल्या घोड्याला टाच दिली आणि विजेच्या वेगानें तो आपल्या शत्रूंवर तुटून पडला. पहिल्या फटक्यांतच त्यानें रेजिनाल्डला लोळवलें. तसाच घोडा पळवून त्यानें ॲथलस्टेनच्या घोड्याला एवढी प्रचंड टक्कर दिली, कीं ॲथलस्टेन तात्काळ घोड्यावरून कोसळला आणि बेशुद्ध पडला. प्रेक्षकांनीं हुल्लड करून मैदान डोक्यावर घेतलें. पण गंमत अशी कीं एवढें झाल्यानंतर पुन्हा एकदा काळ्या सरदारला आळस चढलेला दिसला. कारण त्यानें आपल्या घोड्याचा वेग कमी केला आणि उरलेल्या दोन लढवय्यांपासून तो दूर निघून गेला.

गिलबर्टचा घोडा बराच जखमी झाला होता. आणि स्वतः तो सुद्धा खूप दमला होता. त्यामुळें आपले साथीदार गळलेले पाहून त्यानें मुकाट्यानें पराभव मान्य केला.

अंतिम विजेता कोण याबद्दल आतां कोणालाच शंका उरली नव्हती. अनोळख्या शिलेदाराच्या जयजयकारानें लोकांनीं मैदान दणाणून सोडलें होतें. तुताऱ्या, शिंगें ह्यांच्या कर्कश आवाजाची त्यांत भर पडत होती. दरबारी शिलेदारांच्या खास पथकानें अनोळख्या शिलेदाराला रोवेना जेथें बसली होती तेथें मिरवीत नेलें. त्यानें आपल्या डोक्यावरील शिरस्त्राण उतरवायला पूर्वीप्रमाणेंच विरोध केला. पण आतां कोणींच त्याचें ऐकलें नाहीं. शिपायांनीं त्याच्या डोक्यावरील शिरस्त्राण जबरदस्तीनें उतरवलें. पंचवीस वर्षांच्या एका उमद्या तरुणाचा चेहरा सर्वांना दिसला. तो तरुण अत्यंत दमलेला दिसत होता. त्याच्या कपाळावरून रक्ताचा एक ओघळही वहात होता. आपल्या उच्चासनावरून उतरून रोवेना त्याला मुकुट अर्पण करण्यासाठीं पुढें आली. पण त्या तरुणाच्या चेहऱ्याकडे तिचें लक्ष गेलें मात्र, तिच्या चेहऱ्यावर

कमालीचें आश्चर्य दिसूं लागलें आणि तिच्या तोंडून एक अस्फुट किंकाळी बाहेर पडली. पण तिनें तेवढ्यांत स्वतःला सावरून घेतलें.

तो तरुण किंचित् पुढें वाकला आणि त्यानें आपल्या मस्तकावर त्या मुकुटाचा स्वीकार केला. पण एकाएकीं त्याची शक्ति जणूं नाहींशी झाली आणि धाडकन् मागें कोसळून तो बेशुद्ध पडला! शिपायांनीं घाईघाईनें त्याच्या शरीरावरील चिलखत बाजूला केलें. त्यावेळीं त्यांना



असें आढळलें कीं त्याच्या उजव्या खांद्याखालीं बरीच खोल जखम झालेली आहे. त्यांनीं लगेच त्याला शुश्रूषा करण्यासाठीं तेथून बाजूला नेलें.

हा सर्व प्रकार पहाणारा सेड्रिक पुतळ्यासारखा निश्चल होता. कारण तो तरुण म्हणजे ज्याला त्यानें शिक्षा म्हणून हद्दपार केलें होतें तो त्याचा पुत्र आयव्हॅनो होता!

# ७ लॉकसले

आयव्हॅनो हें नांव थोड्याच वेळांत सर्वतोमुखीं झालें. जो तो त्याच्या शौर्याची स्तुति करीत होता. पण जॉननें त्याचें नांव ऐकल्यावर नाक मुरडलें. एवढेंच नव्हें तर तो कांहींसा चिंताक्रांत झाला. कारण आयव्हॅनो हा रिचर्डचा एकनिष्ठ आणि आवडता सरदार आहे हें त्याला माहीत होतें. शिवाय आयव्हॅनो धर्मयुद्धावर गेला आहे ही संधि साधून जॉननें त्याची इस्टेट मोठ्या उदारपणें आपला साथीदार रेजिनाल्ड ह्याला बहाल केली होती. आयव्हॅनो आतां परतला आहे, तेव्हां तो आपला हक्क पुढें मांडल्याशिवाय राहणार नाहीं ही सुद्धा जॉनला खात्री होतीच.


जॉनच्या दृष्टीनें आयव्हॅनो परतला ही गोष्ट रिचर्डही लवकरच परतणार ह्या गोष्टीची जणूं कांहीं नांदीच होती. अर्थात् रिचर्डची गादी बळकावण्याचा त्याचा बेत आतां सहज सिद्धीला जाणार नव्हता! तरीही त्याच्या बाजूला जमा झालेल्या एकनिष्ठ सरदारांवर भिस्त ठेवून त्यानें आपली कारस्थानें चालूच ठेवण्याचें ठरवलें. सुदैव एवढेंच होतें कीं आयव्हॅनो बराच जखमी झाला होता. त्यामुळें कांहीं दिवस तरी त्याच्याकडून विरोध होण्याची भीति नव्हती.

इतक्यांत त्याच्या दुर्दैवानें बातमी आली कीं रिचर्ड इंग्लंडकडे परत येण्यास निघाला आहे. मध्यंतरीं रिचर्डचें ऑस्ट्रियाच्या राजाशीं वाकडें आल्यामुळें रिचर्डला त्यानें अडकवून ठेवलें होतें. जॉनला हीं पर्वणी होती. रिचर्डची सुटका होऊं नये म्हणून त्यानें मनांतल्या मनांत अनेकदा प्रार्थना केली होती. पण परमेश्वरानें तिकडे पूर्ण दुर्लक्ष केल्यासारखें दिसत होतें!

रिचर्ड परत येण्यास निघाला आहे हें कळतांच आपल्या बाजूच्या सरदारांची जमवाजमव करण्यास जॉननें सुरवात केली. जनतेला कांहीं जॉन फारसा पसंत नव्हता. तेव्हां जॉनच्या बाजूच्या शहाण्या सरदारांनीं

त्याला प्रथम लोकांना खूष ठेवणें हें राजाचें कर्तव्य आहे ह्याची जाणीव दिली ! त्यामुळें सामने बरखास्त करण्याऐवजीं त्यानें ते तसेच चालू ठेवण्याचें ठरवलें. आतां ख्यातनाम तिरंदाजांच्या शर्यती होणार होत्या.

अनेक लोक आपलें कौशल्य पणास लावण्यासाठीं पुढें सरसावले. पण जेव्हां त्यांनीं एकामागून एक सुप्रसिद्ध अशा दरबारी तिरंदाजांचीं नांवें ऐकलीं तेव्हां कित्येकांनीं निमूटपणें आपली नांवें मागें घेतलीं लोकांना वाटलें, दरबारी तिरंदाजांशीं कोण टक्कर खाणार ? पण तरीही



असे आठ धाडसी वीर निघालेच. त्यांना राजाच्या पुढें आणण्यांत आलें. सगळे मोठे उमदे, उत्साही दिसत होते. गोंधळून मुळींच गेले नव्हते ते. पण त्यांतल्या एकाकडे पाहून मात्र जॉननें नाक मुरडलें. त्याचा वेष अगदीं गबाळा होता. स्वारीचें लक्ष कोणीकडे होतें कोणास ठाऊक ! राजाला मुजरा करतांना तर तो इतका गोंधळून

गेला होता कीं लोकांनीं त्याची हुर्यो केली. पण त्याला त्याचेंही फारसें कांहीं वाटल्यासारखें दिसलें नाहीं.

"नां त काय आपलं ?" जॉननें कांहींशा विस्मयानें, कांहींशा तुच्छतेनें त्याला प्रश्न केला.

"लॉक्सले." त्यानें तितक्याच बेफिकिरीनें उत्तर दिलें.

दूर अंतरावर लाकडी माळे उभे केले होते. त्यांवर एकांत एक अशीं वर्तुळें काढलेलीं होतीं. त्यातल्या अगदीं मधल्या, छोट्या वर्तुळांत ज्याचा बाण बसेल तो विजयी ठरणार होता. शर्यतीला जेव्हां सुरवात झाली तेव्हां सरासर इतके बाण सुटूं लागले कीं प्रेक्षकांची नजर ठरेना. सरावलेल्या पंचांनीं बाद झालेल्या स्पर्धकांना भराभर बाजूला नेलें. आणि गंमत अशी कीं शेवटीं दोघेच उरले. म्हणजे फिलिप मॅलव्होझिनचा सेवक ह्यूबर्ट आणि गबाळा लॉक्सले. लॉक्सलेकडे पाहून जो तो आश्चर्य करूं लागला.

ह्या दोघांत शेवटची फेरी लढली जाणार होती. पण दोघांनींही इतकी सफाईदार तिरंदाजी केली कीं दोघांचेही तीर मधल्या ठिपक्यांत घुसले. जॉनपुढें आतां पेचप्रसंग उभा राहिला. बक्षीस कोणाला द्यायचें ? खरे म्हणजे ह्या भिकारड्या लॉक्सलेनें इतकी उत्कृष्ट तिरंदाजी करावी ह्याचें त्याला वैषम्यच वाटत होतें. "आतां कसं काय ?" आपली दाढी कुरवाळीत जॉननें आजूबाजूस बसलेल्या सरदारांना प्रश्न केला.

पण लॉक्सलेनें ही अडचण ओळखली असावी. कारण तो जरा बाजूला गेला आणि एका वेताच्या झाडाची हिरवीगार लवचिक छडी तोडून घेऊन परत आला. जॉन त्याच्याकडे, कुतूहलानें पहात होता. लॉक्सलेनें ती छडी लाकडी फळ्यापाशीं रोवून ठेवली. "चलो, ह्यूबर्ट !" तो म्हणाला. "आतां आपल्या नेहमींच्या रेघेवर उभं रहायचं आणि बाण मारायचा. ज्याचा छडीला लागेल तो जिंकला. कबूल ?"

ह्यूबर्टला कबूल करण्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. त्यानें नवीन चांगलें धनुष्य घेतलें, नवीन बाण त्याला जोडला आणि डावा डोळा मिटून नीट नेम धरला. जिकडे तिकडे शांतता पसरली होती. प्रत्येक प्रेक्षक डोळे फाडफाडून आतां पुढें काय होतें आहे हें पाहण्यासाठीं स्तब्ध झाला होता. खुद्द जॉनची उत्सुकता कळसास पोचली होती.

ह्यूबर्टनें मोरे नीट नेम धरून बाण सोडला खरा, पण तो भलती-कडेच गेला. ती छडी आपली जशीच्या तशी उभी होती. आतां लॉक्सले काय करतो इकडे सर्वांचें लक्ष लागलें.

"थोडं चुकलं बघ तुझं!" असें म्हणत लॉक्सलेनें ह्यूबर्टच्या पाठीवर मोठ्या प्रेमानें थाप मारली. मग त्यानें आपल्या भात्यांतून एक सुटसुटीत तीर काढला आणि धनुष्याला जोडला; क्षणभर डोळा मिटल्यासारखें केलें आणि तीर सोडला. सर्रकन् गेलेल्या त्या तीरानें छडीचे बरोबर दोन तुकडे केले! प्रेक्षकांचा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसेना. अशी तिरंदाजी त्यांनीं कधीं पाहिली नव्हती. राजेसाहेब देखील क्षणभर आपण दाखवलेली तुच्छता विसरले आणि लॉक्सलेला शाबासकी देण्यासाठीं पुढें आले. पण मैदानांत लॉक्सलेभोंवती प्रेक्षकांनीं इतकी गर्दी केली होती कीं जॉनला त्या कोंडाळ्यांत जाणें अशक्य होतें. आणि लॉक्सलेला तरी त्या बक्षिसाची कुठें कदर होती! तो आपल्याभोंवती जमलेल्या गर्दीतून वाट काढून केव्हां निघून गेला हें जॉनला कळलेंही नाहीं.

सामने संपल्याचें जाहीर करण्यांत आलें आणि जो तो परतण्याची तयारी करूं लागला. निघतां निघतां जॉननें चटकन् आपल्या एका विश्वासू नोकराला बोलावलें आणि त्याच्या कानांत सांगितलें, "हें बघ, त्या ज्यूला—इझाकला—गांठा आणि त्याला सांगा, मला पैशाची अत्यंत जरूर आहे! पैसे तात्काळ पाठवून द्यायला सांगितलं आहे म्हणावं."

आपल्या वैभवानें लोकांचे डोळे दिपवून टाकावेत आणि आपल्या आदरातिथ्यानें आपल्या पक्षाच्या सरदारांना खूष ठेवावें ह्या उद्देशानें त्या रात्रीं जॉन राजानें एक भली जंगी मेजवानी घडवून आणली. तसें म्हटलें तर विजेत्या आयव्हॅनोच्या सन्मानार्थ मेजवानी होती. पण तो बिचारा जखमी होऊन रुग्णशय्येवर पडला होता. रोवेनाही नेहमींच्या मनःस्थितींत नव्हती. त्यामुळें सेड्रिक आणि अॅथलस्टेन हे दोघेच त्या मेजवानीला उपस्थित राहूं शकले.

रोवेना न आल्यामुळें जॉन राजा कांहींसा नाखूष झाला असला तरी त्यानें तसें मुळींच दर्शवलें नाहीं. उलट आज त्यानें अतिशय उल्हसित आणि विनयी वृत्ति धारण केली होती. सर्वच पाहुण्यांचें स्वागत तो मोठ्या इतमामानें करीत होता.

मेजवानी चालू असतांना गप्पांचा विषय अर्थात् नुकतेच झालेले सामने हाच होता. जो तो आयव्हॅनोच्या अप्रतिम कौशल्याची वाखाणणी करीत होता. खुद्द जॉननेंही स्तुतिसुमनें उधळण्यांत मुळींच कसूर केली नाहीं. अकस्मात् उपटलेल्या त्या काळ्या सरदाराचेंही अनेकजण कौतुक करीत होते. पण सामने संपल्यावर काळा सरदार जो नाहींसा झाला तो त्यानंतर कोणालाच दिसला नव्हता. सगळे लोक ह्याविषयीं आश्चर्य करीत होते.

जॉनच्या इच्छेप्रमाणें समारंभ मोठ्या थाटांत आणि खेळीमेळीच्या वातावरणांत पार पडला. फक्त आयव्हॅनोचा विषय निघाला म्हणजे सेड्रिक गंभीर व्हायचा. अजूनही आपल्या उच्छृंखल पुत्रावरचा त्याचा राग कमी झालेला दिसत नव्हता. त्यांत पुन्हा कांहींनीं तापट सेड्रिकची थोडी थट्टा केल्यामुळें तो चिडून निघून गेला होता. पण एकंदरींत सर्वांचें वागणें जॉनच्या पसंतीस उतरलें होतें.

समारंभ संपल्यावर जॉनला पुन्हा एकदा चिंतेनें ग्रस्त केलें. रिचर्ड लवकरच परतणार ही बातमी आल्यापासून बिचाऱ्याची झोप उडाली होती. शेवटीं जेव्हां त्यानें आपले जिगरदोस्त सरदार फित्झपर्स आणि द ब्रासी यांच्याशीं दीर्घ काळ बातचीत केली आणि पुढील बेत ठरवले तेव्हां कुठें त्याच्या मनाला थोडी स्वस्थता मिळाली.



जॉनभोंवती राहू-केतूप्रमाणें घोटाळणारी ही जोडी अतिशय धूर्त आणि कारस्थानी म्हणून प्रसिद्ध होती. जॉनविषयीं फारसा आदर कोणालाच नव्हता. कांहींजण बक्षिसाच्या तर कांहीं मानाच्या लालचेनें आणि उरलेले लोक न्यायनिष्ठुर रिचर्डच्या भीतीनें जॉनच्या आश्रयाला आले होते. म्हणजे जॉनभोंवती किती संधिसाधू आणि दुष्ट

सरदारांचें वलय जमलें होतें त्याची कल्पना करतां येईल. फित्झपर्स आणि द ब्रासी हे अशा सरदारांचे मेरुमणी. अॅश्बीच्या सामन्यांपासून अपमानित झालेल्या गिलबर्टची आतां त्यांच्यांत भर पडली होती.

द ब्रासीचा रोवेनावर डोळा आहे हें अनेकांना ठाऊक होतें. पण जॉनला गादी मिळवून द्यायची म्हणजे सॅक्सन लोकांना दुखवून चालणार नाहीं ह्याचीही त्यांना कल्पना होती. त्यामुळें द ब्रासीला उघड असा पाठिंबा कोणींच अजून दिला नव्हता. पण तो कावेबाज होता. त्यानें निराळाच डाव टाकला. अॅश्बीहून परततांना जंगलांत सेड्रिक आणि रोवेना यांच्या जथ्थ्याला अकस्मात् गांठायचें, जणूं कांहीं गुंडांनींच हल्ला केला आहे असें भासवायचें आणि मग द ब्रासीनें मोठें शौर्य गाजवून रोवेनाला गुंडांच्या तावडींतून मुक्त करायचें! असा हा डाव होता. गुंडांच्या टोळीचें नेतृत्व धर्मवीर गिलबर्ट हे केवळ मित्राला मदत करण्याच्या उद्देशानें स्वीकारणार होते!

आयव्हॅनो अतिशय जखमी झाला आहे हें सेड्रिकला माहीत होतें. म्हणून तो जरी स्वतः जागचा हलला नाहीं तरी बेशुद्ध आयव्हॅनोला जेव्हां शिपाई उचलून नेत आहेत असें त्यानें पाहिलें, तेव्हां आपला विश्वासू सेवक ओस्वाल्ड याला त्यानें सक्त पाळत ठेवण्यास बजावलें होतें. पण ओस्वाल्डला निघण्यास उशीर झाला म्हणा किंवा पाळत ठेवण्याचें काम त्याच्या हातून नीट झालें नाहीं म्हणा, त्याला कांहीं जखमी आयव्हॅनोचा पत्ता लागला नाहीं. त्यामुळें आयव्हॅनो त्याच्या शत्रूच्या ताब्यांत तर गेला नाहीं अशी चिंता त्याला वाटूं लागली. पण शोध करतांना त्याला गर्थ मात्र सांपडला. गर्थ वेषांतर करून आयव्हॅनोचा नोकर म्हणून राहिला होता. पण त्यालाही मालकाचा पत्ता न लागल्यामुळें स्वारी बावचळून गेली होती. गर्थला ओस्वाल्डनें पकडला आणि सेड्रिकसमोर नेऊन उभा केला. आपल्याला न सांगतां

गेल्याबद्दल सेड्रिक गर्थवर चिडलेला होताच. त्यानें तात्काळ गर्थला बंदिवान करण्याचा हुकूम दिला.

जॉनकडील मेजवानी आटोपून सेड्रिक आपल्या गढीकडे जाण्यास निघाला तो आयव्हॅनोचें काय झालें असेल ही चिंता मनांत बाळगूनच. आयव्हॅनोवर तो कितीही रागावलेला असला तरी मुलाची काळजी पित्याला वाटल्याशिवाय कशी राहील ?

परततांना आपल्यावर कदाचित् संकट कोसळेल अशी कुणकुण सेड्रिकला लागली होती. त्यामुळें जंगल लागल्यावर त्यानें तें पार करण्याची घाई चालवली. ह्याच जंगलांत छुपे हल्ले करणारे गुंड आणि रॉबिन हुडचे रंगेल गडी ह्यांचें वास्तव्य आहे हें त्याला माहीत होतें. जसजसे ते जंगलाच्या मध्यभागीं येऊं लागले, तसतशा "धावा–धावा !" अशा किंकाळ्या त्यांच्या कानीं पडूं लागल्या. सेड्रिक आणि ॲथलस्टेन ह्यांनीं लगेच आपले घोडे पुढें फेकले. कांहींसें पुढें गेल्यावर त्यांना एक विचित्र दृश्य दिसलें.

जंगलांतील अंमळ मोकळ्या जागेंत एक मेणा जमिनीवर पडलेला होता. जवळच एक ज्यू स्त्री खालीं मान घालून बसली होती. आणि रागानें लाल झालेला एक दाढीवाला म्हातारा जळफळत होता आणि मधूनच मदतीसाठीं हाका देत होता. ही जोडी म्हणजे इझाक आणि रिबेक्का हें तुम्हीं ओळखलेंच असेल. सेड्रिकनें त्यांची विचारपूस केली. पण किती तरी वेळ आपल्या देवाचा धांवा करण्यापलीकडे इझाकच्या तोंडून कांहीं शब्द फुटला असेल तर शपथ !

शेवटीं त्यांना जी हकीकत कळली ती अशी– आपल्याबरोबर एक आजारी माणूस असल्यामुळें इझाकनें कांहीं भाडोत्री शिपायांचें संरक्षण घेऊन रस्ता सुधारला होता. पण जंगलांत गुंड लोकांचा आपल्यावर हल्ला होण्याचा धोका आहे हें कळतांच ते भाडोत्री शिपाई ह्या दोघांना एकटेच टाकून पसार झाले होते. एवढेंच नव्हे तर त्या मूर्ख शिपायांनीं आजारी माणसाचें ओझेंही आपल्याबरोबरच नेलें होतें !

रोवेनाला त्यांची दया आली आणि तिच्या आग्रहाला मान देऊन सेड्रिकनें इझाक व रिबेक्का ह्यांना आपल्याबरोबर घेण्याचें आणि जवळपासच्या खेड्यांत पोचवण्याचें कबूल केलें. आतां संध्याकाळ होत चालली होती आणि जंगलांत अंधार दाटूं लागला होता. त्यामुळें सर्व घाईघाईनें चालूं लागले. जंगलाच्या जवळजवळ सीमेवर त्यांना एक ओढा लागला. रोवेना आणि रिबेक्का यांचा मेणा आणि इतर सामान संभाळून तो पार करणें म्हणजे मुष्किलीचें होतें. पण इलाज नव्हता.

इतक्यांत चहूं बाजूंनीं त्यांच्यावर प्रचंड हल्ला झाला. हल्लेखोरांची संख्या एवढी होती कीं शस्त्रांची चकमक झडलीच नाहीं. दहा–वीस धटिंगणांनीं सेड्रिक आणि ॲथलस्टेन यांना वेढून त्यांना केव्हांच निःशस्त्र केलें. इतरांचीही तीच दशा झाली. ह्या तडाख्यांतून फक्त दोघे सुटले. ते म्हणजे गर्थ आणि वाम्बा. गर्थ तर बंदिवान होता आणि वाम्बा बोलून चालून खुशमस्कऱ्या. ते दोघेही मागून येत होते आणि कोणाचें त्यांच्याकडे लक्ष गेलें नाहीं. अंधाराचा फायदा घेऊन ते बाजूच्या जंगलांत पळाले.

आपण आपल्या धन्याला संकटांत टाकून पळालों ह्याची दोघांनाही खंत वाटत होती. पण गर्थचें म्हणणें पडलें कीं आपण मोकळे आहोंत तेंच बरें आहे; म्हणजे मालकाच्या सुटकेसाठीं आपल्याला कांहींतरी हालचाल करतां येईल. दोघेही विचार करीत जंगल तुडवूं लागले.
इतक्यांत कोणींतरी त्यांना अडवलें. हिरव्या मखमलीचा ऐटबाज पोशाख केलेला एक तिरंदाज त्यांची वाट रोखून उभा होता. पण चतुर वाम्बानें त्याला ओळखलें. तो लॉक्सले होता. वाम्बानें आपल्यावर आणि सेड्रिकवर कोसळलेल्या संकटाची त्याला कल्पना दिली. त्याचा चेहरा लगेच गंभीर झाला.

"दोस्त हो!" तो गंभीर आवाजांत म्हणाला, "सेड्रिकसाहेबांवर कोणीं हल्ला केला ह्याची मला कल्पना आहे. पण सध्या तरी त्यांच्या जिवाला धोका नाहीं. त्यांच्या सुटकेसाठीं मी तुम्हांला नक्कीच मदत करीन. चला माझ्याबरोबर!"

# ९ बुवांच्या झोपडींत

सामने संपल्यानंतर काळ्या सरदारानें सरळ जंगलचा रस्ता पकडला. आयव्हॅनो आतां सुरक्षित आहे ह्याचें त्याला बरेंच समाधान वाटत होतें. बाकी इतरांच्या भानगडींत पडण्याची त्याची फारशी इच्छा नव्हती. उलट आपल्याकडे फारसें कोणाचें लक्ष जाऊं नये अशीच खबरदारी तो घेत होता.

पण आतां तो थकलाही होता आणि त्याच्या पोटांत कावळे कोकलायला लागले होते. त्याचा घोडाही पुढें जायला कुरकुरत होता. जवळपास कुठें आसरा मिळतो कीं काय हें पाहात तो रस्ता आक्रमीत होता. थोड्या वेळानें तो एका अतिशय रमणीय जागीं येऊन पोचला. येथें जंगल विरळ होतें आणि मध्यभागीं एक छोटेसें निळें निळें तळें पसरलें होतें. पलीकडच्या टेकडीवरून उड्या मारीत एक धबधबा तळ्यांत पडत होता. तळ्याच्या कांठाशीं, गर्द झाडीच्या सीमेवर एक नीटनेटकी झोपडी उभी होती. तिच्या चिमणींतून धूर बाहेर पडत होता; आणि आंतून कसलेतरी गंभीर सूर कानांवर पडत होते. तो रम्य प्रदेश पाहून सरदाराचे डोळे निवले. आपल्या घोड्याला पाणी प्यायला सोडून तो झोपडीकडे गेला आणि त्यानें दार ठोठावलें. आंतून येणारा आवाज बंद झाला. तरी आंतला मनुष्य बायबल पढतो आहे तेव्हां तो कोण असावा हें सरदारानें ओळखलें.

"बुवा, गरीब वाटसरूला आसरा द्यावा असं धर्मांत सांगितलं आहे." सरदारसाहेबांनीं सुनावलें.

"अशा भलत्या वेळेस, भलत्या माणसाला दार उघडावं असं कुठेंही लिहिलेलं नाहीं!"

"आपण तर आंत येणार बुवा!" सरदारसाहेब निश्चयी स्वरांत

म्हणाले. “अहा, वास काय इतका सुटला आहे! माझ्या पोटांत आग पडली आहे नुसती! तें कांहीं नाहीं. बुवा, माझ्यासारख्या गरीब माणसाला तुम्हीं दया दाखवलीच पाहिजे.”

बुवांना ह्या ‘गरीब’ माणसाच्या आगाऊपणाचा राग आला. पण शेवटीं त्यांनीं दार उघडलें. सरदारजी आंत घुसले आणि त्यांनीं सरळ टेबलापाशीं ठिय्या दिला.

“आणा बुवा लवकर!” जणूं कांहीं आपण स्वतःच्या घरींच बसलों आहोंत अशा थाटांत सरदारानें फर्मावलें. बुवा चांगलेच गरम झाले होते. पण बिचाऱ्यानें मुकाट्यानें जेवण टेबलावर ठेवलें. सरदारसाहेब मोठे गर्विष्ठ दिसत होते. कितीं वेळ त्यांची एकट्याचीच वडवड चालू होती. पण हळूहळू बुवांचा रागही शमला आणि त्यांनींही गप्पांत भाग घ्यायला सुरवात केली. जेवण झाल्यावर तर गप्पांना नुसता ऊत आला. झोपडीच्या कोपऱ्यांत धूळ खात पडलेली एक सारंगी दिसतांच सरदारजींना भलताच उत्साह चढला. त्या जुनाट सारंगींतून आपल्या राठ हातानें त्यांनीं जे नाजूक हळुवार सूर काढले तें ऐकून बुवांचें हृदय हेलावलें. बुवांनींही मग सूर लावला आणि कांहीं वेळ जंगल भसाड्या आवाजांतील संगीताच्या मैफलीनें दुमदुमून गेलें.

इतक्यांत झोपडीच्या दारावर थाप पडली. पण बुवा आणि सरदारजी ह्यांची ‘जुगलबंदी’ इतकी रंगली होती कीं दोघांनाही ती ऐकूंच गेली नाहीं. शेवटीं दारावर धडका वसूं लागल्या. “मी लॉक्सले आहें. बुवा! दार उघडा लवकर.” बाहेरून मोठ्यानें गर्गशा ऐकूं आला. लॉक्सले हें नांव बुवांना ऐकूं गेलें असावें. कारण ते लगबगीनें उठले आणि दार उघडण्यास गेले.

“काय तमाशा आहे, बुवा? मीं वुइल्ला आणि ॲलन-अ-डेलला एका कामगिरीवर पाठवलं होतं, त्यांची काय खबर आहे?” आंत

येतांच लॉक्सलेनें प्रश्नांचा भडिमार केला. पण सरदारसाहेबांकडे लक्ष जातांच तो एकदम गप्प झाला. बुवांनीं त्याला खूण करून सरदारसाहेबांपासून धोका नाहीं अशी हमी दिली. सरदारसाहेबांच्या करारी नि शांत चेहऱ्याकडे पाहून त्याचा संशय निवळला असावा.

बुवांनीं मात्र सरदारसाहेबांना थक्क केलें. झोपडीच्या भिंतींतील गुप्त कळ फिरवून त्यांनीं झटकन् एक कपाट उघडलें. कपाटांतून लॉक्सलेच्या पोशाखासारखा हिरवा पोशाख काढला आणि स्वतःचा पायघोळ झगा काढून टाकून तो पोशाख परिधान केला त्या गुप्त कपाटांत बरींच शस्त्रेंही ठेवलेलीं सरदारसाहेबांच्या नजरेस पडलीं. बुवांनीं त्यांतली एक लखलखीत तलवार कमरेला अडकवली आणि एक मजबूत तिरकमठा बरोबर घेतला. सरदारसाहेब. हें सर्व पहात होते. बुवांनीं त्यांच्याकडे एक सूचक नजर टाकून मिस्किल हास्य केलें. लॉक्सलेच्या पाठोपाठ आलेले वाम्बा आणि गर्थही आश्चर्य-चकित झाले.

ह्या अवधींत लॉक्सलेनें सरदारसाहेबांना जरा बाजूला नेलें.

" अॅश्बीच्या सामन्यांत ऐन वेळीं तुम्हीच धावून आलां होतां ना ? मीं ओळखलं तुम्हांला, सरदारसाहेब !" तो म्हणाला.

" आणि तुझ्याच बाणानें छडी पिंजलेली होती हें सुद्धा मीं ओळ-खलं आहे !"

" मग तुम्ही आमचे मित्रच आहांत असं धरून चालायला हरकत नाहीं. कारण तुम्हीं ज्याला मदत केलीत, त्याची सुटका करण्याच्या मागें आहोंत आम्ही " असें म्हणून लॉक्सलेनें, आयव्हॅनोचा कसा पत्ता नाहीं, सेड्रिकवर कसा हल्ला झाला, वगैरे हकीगत सरदार-साहेबांना ऐकवली. त्यांनीं मदतीचें लगेच आश्वासन दिलें. एवढेंच नव्हे तर लॉक्सलेचा हात प्रेमानें आपल्या हातांत घेऊन ते म्हणाले, " लॉक्सले, तुझ्यासारखीं प्रामाणिक माणसं मला नेहमींच आवडतात. तुझ्या प्रामाणिकपणाचं योग्य चीज केल्याशिवाय मी राहणार नाहीं."

लॉक्सलेनें कांहींशा आश्चर्यानेंच त्यांच्याकडे पाहिलें.

⚜

# १० दुसरे एक बुवा !

ज्या त्वरेनें सेड्रिक आणि त्याच्याबरोबरच्या इतर मंडळींना हल्ले-खोरांनीं बंदिवान केलें, त्याच त्वरेनें त्यांनीं आपल्या कैद्यांना आपल्या-बरोबर चालवलें. रात्रभर त्यांचा प्रवास चालू होता. त्या हल्लेखोरांना जंगलांतील रस्ते माहीत नसावेत; कारण पुष्कळदा ते वाट चुकून भलतीकडेच जात, पुन्हा मूळ स्थानावर परत येत आणि वाट शोधण्याचा प्रयत्न करीत. शेवटीं उजाडण्याच्या सुमारास ते एका भल्या मोठ्या किल्ल्याजवळ येऊन पोचले.

सेड्रिकनें आपल्याला कैद करून चालणाऱ्या शिपायांकडून आपण कोणाच्या तावडींत सांपडलों आहोंत हें कळून घेण्याचा प्रयत्न केला; पण त्या शिपायांनीं एक चकार शब्द तोंडांतून काढला नाहीं. तो प्रचंड किल्ला पाहतांच मात्र सेड्रिकला उलगडा झाला. कारण तो किल्ला त्या भागांत फार प्रसिद्ध होता. त्याचा सध्याचा मालक होता सरदार रेजिनाल्ड !

द ब्रासी यानें आंखलेला बेत सिद्धीस गेला होता. रोवेना त्याच्या हातांत आली होती. किल्ल्यांत येऊन पोचल्याबरोबर प्रत्येक कैद्याला वेगवेगळे ठेवण्यांत आलें. सेड्रिक आणि रोवेना यांची जशी ताटातूट झाली तशीच इझाक आणि रिबेक्का यांचीही झाली. सेड्रिकनें ह्यावर आकाशपाताळ एक केलें आणि इझाकनें आपल्या पैशाचीही लालूच दाखवली; पण कोणींही तिकडे लक्ष दिलें नाहीं.

इझाकला एकदम अंधारकोठडी दाखवण्यांत आली. असें कांहीं तरी आपल्या नशिबीं येईल ह्याची त्या बिचाऱ्याला कल्पना होतीच. कारण आपणांकडून वाटेल तसे पैसे उकळण्यासाठीं हे ख्रिश्चन लोक वाटेल तो छळ करण्यास मागेंपुढें पाहणार नाहींत ही खूणगांठ त्यानें

केव्हांच मनाशीं बांधली होती. पण त्याची लाडकी रिबेक्का त्याच्यापासून दूर गेल्यामुळें तो मनांतल्या मनांत अतिशय संतापला होता.

द ब्रासी आणि गिलबर्ट ह्या दोन लांडग्यांनीं मोठ्या साळसूदपणें आपल्या तावडींतील भक्ष्याची वांटणी करून घेतली ! द ब्रासीचा रोवेनावर डोळा होता हें उघडच होतें. गिलबर्टनें रिबेक्का आपल्याला पसंत करते का असा प्रयत्न करून पहाण्याचें ठरवलें. पण दुर्दैवानें दोघांच्याही पदरीं निराशाच पडली.

रोवेना आपलें ऐकत नाहीं, आपल्या ऐश्वर्याला मानमरातबाला



भुलत नाहीं हें पाहून वैतागलेल्या द ब्रासीनें आपलें शेवटचें अस्त्र

काढलें. त्यानें जेव्हां हें उघड केलें कीं जखमी आयव्हॅनोही आपल्याच तावडींत सांपडला आहे आणि ह्याच किल्ल्यांत त्याला एका गुप्त ठिकाणीं ठेवलेलें आहे, तेव्हां मात्र रोवेना चरकली. "तूं माझ्या म्हणण्याला रुकार दिला नाहींस तर आयव्हॅनोचा जीव धोक्यांत आहे" अशी धमकी देण्यास तो चुकला नाहीं. रिबेक्कानें गिलबर्टला सरळ धुडकावून लावलें; आणि " तूं बळजबरी करायला लागलास तर मी आत्महत्त्या करीन " असें निर्वाणीचें अस्त्र सोडल्यामुळें गिलबर्टनें मुत्सद्दीपणानें माघार घेतली !

हे दोन लांडगे अशा तऱ्हेनें आपापल्या नशिबाची परीक्षा पहाण्यांत गुंतलेले असतांना दोघांच्याही कानांवर जोरजोरानें फुंकलेल्या शिंगाचा आवाज अकस्मात् पडला. तो धोक्याचा इशारा आहे हें समजल्यामुळें दोघेही आपापल्या कैद्यांना सोडून किल्ल्यांतील मुख्य दिवाणखान्यांत परतले. रेजिनाल्ड त्यांची तेथें वाटच पहात बसला होता. त्याच्या हातांत एक नुकतेंच आलेलें पत्र होतें. त्यानें ते या दोघांना वाचायला दिलें.

" आपल्या ताब्यांतील सरदार सेड्रिक, लेडी रोवेना, सरदार अॅथल-स्टेन आणि ज्यू इझाक व त्याची कन्या रिबेक्का ह्या कैद्यांना आपण पत्र मिळाल्यापासून एक तासाच्या अवधींत मुक्त करा. न केल्यास आम्हांला इतर वाटेल त्या उपायांनीं त्यांची सुटका करणें भाग पडेल !" सही— " वाम्बा आणि गर्थ. "

द ब्रासी आणि गिलबर्ट ह्यांना तें पत्र वाचल्याबरोबर प्रचंड हसूं कोसळलें. पण रेजिनाल्ड गंभीर होता. कारण किल्ल्याबाहेर जंगलांत जवळजवळ दीड दोनशें हत्यारी लोक जमले आहेत आणि अॅश्बी-प्रसिद्ध काळा सरदार व लॉक्सलेची टोळी त्यांना सामील आहेत ही बातमी त्याच्या कानांवर आली होती. त्याच्या किल्ल्यांत फारशी शिबंदी नव्हती; आणि बाहेरून चटकन् मदत मिळण्याचीही फारशी आशा

नव्हती. परिस्थितीची जाणीव जेव्हां त्यानें आपल्या मित्रांना करून दिली, तेव्हां त्यांनाही गंभीरपणें विचार करणें भाग पडलें.

ही अपमानकारक मागणी मान्य करणें अर्थातच नामुष्कीचें होतें. "कैदी परत पाठवण्याचें तर सोडाच, पण आम्हीं आमच्या ताब्यांतील कैद्यांची उद्यां सकाळीं स्वर्गांत रवानगी करणार आहोंत, तेव्हां त्यांच्या-साठीं प्रार्थना करण्यास योग्य असा एखादा सॅक्सन धर्मगुरु आपल्याकडे असल्यास पाठवावा. त्याला योग्य वागणूक दिली जाईल" असें मोठें मानभावी उत्तर त्यांनीं रवाना केलें.

त्यांच्या अपेक्षेप्रमाणें हें उत्तर मिळाल्यावर जंगलांत जमलेल्या वाम्बा आणि मंडळींच्या तळपायांची आग मस्तकांपर्यंत भिडली. काळ्या सरदारानें त्यांना सबूर केलें नसतें तर ते तसेंच किल्ल्यावर तात्काळ चालून गेले असते! पण सकाळच्या आंत सेड्रिक वगैरे मंडळींची सुटका करावी कशी हा प्रश्नच होता अशा आणीबाणीच्या प्रसंगीं वाम्बाच्या तल्लख मेंदूतून एखादी कल्पना बाहेर पडली नाहीं तर तो वाम्बा कसला! "शत्रुपक्षानें एखादा धर्मगुरु मागितलाच आहे ना, मग बघूंच या त्यांची परीक्षा!" असें म्हणून स्वतः वाम्बानें ती कामगिरी पत्करली. बुवांनीं त्याला थोड्याच वेळांत धर्मगुरूचा साज चढवला. आंत प्रवेश करून कांहीं भेद करतां येतो का हें बघण्याचें वाम्बानें ठरवलें. वाम्बाकडून कांहीं खबर येईपर्यंत किल्ल्यांतल्या लोकांना बाहेरून कांहीं मदत मिळत नाहीं ना, हें पहाण्याची जबाबदारी लॉक्सले आणि त्याचे रंगेल गडी यांनीं पत्करली.

थोड्याच वेळांत, खालीं मान घालून, जपमाळ ओढीत एका धर्म-गुरूची स्वारी किल्ल्याच्या दिशेनें वाट चालूं लागली.

# ११ सेड्रिकचें पलायन

वाम्बाचें वेषांतर इतकें बेमालूम झालें होतें कीं त्याला किल्ल्यांत प्रवेश करून घेण्यास अडचण पडली नाहीं. त्याला तात्काळ रेजिनाल्डपुढें उभें करण्यांत आलें. सर रेजिनाल्डनीं त्याच्याकडे एक भेदक नजर टाकली.

“ बुवा, तुम्हीं ह्या गुंड लोकांत कसे काय? ”

“ काय सांगूं, महाराज ? मी नुकता कॅन्टरबरीहून परतत होतों, तर ह्या पापी लोकांनीं माझ्यासारख्या गरीब धर्मगुरूला धाकदपटशा दाखवला आणि कोणा पापी लोकांची मुक्तता करण्यासाठीं आपल्या किल्ल्यांत येणं भाग पाडलं ” धर्मगुरु उद्वेगानें म्हणाले.

“ अस्सं ! त्या गुंडांची संख्या बरीच असावी, नाहीं ? ”

“ होय महाराज, निदान शेंपांचशें तरी असावेत ते. ”

ह्या तोंडी परीक्षेला उतरल्यावर वाम्बाची रवानगी सेड्रिकच्या कोठडींत करण्यांत आली. आंत आल्यावर वाम्बानें दार घट्ट लावून घेतलें आणि आपलें खरें स्वरूप प्रगट केलें. त्याच्या ह्या धाडसानें सेड्रिक व ॲथलस्टेन थक्क झाले. सेड्रिकनें आतां हा वेष चढवावा आणि किल्ल्याबाहेर पडावें असा बेत वाम्बानें सुचवला. आपल्या नोकराची एकनिष्ठा पाहून सेड्रिकच्या डोळ्यांत पाणी उभें राहिलें. पण वाम्बाचें ऐकण्याशिवाय त्याला गत्यंतर नव्हतें. वाम्बानें धर्मगुरूला आवश्यक अशा गोष्टी झटपट सेड्रिककडून पाठ करून घेतल्या, त्याला कांहीं सूचना दिल्या आणि हा नवीन बनावट धर्मगुरु कोठडीबाहेर पडला.

सेड्रिक मोठ्या सावधगिरीनें चालत होता. पण इतक्यांत कोणीं तरी त्याला अडवलें. त्यानें पाहिलें तर ती एक वृद्ध स्त्री होती. तिनें त्याला

अतिशय विनवण्या करून, आपली कहाणी ऐकण्यास एका खोलींत नेलें. सेड्रिकनें मोठ्या नाखुषीनेंच संमति दिली. ती बाई इतकी दीन दिसत होती कीं शेवटीं सेड्रिकला दया आली. मात्र खोलींत आल्यावर त्या बाईनें निराळाच अवतार धारण केला.

"मीं तुम्हांला ओळखलं !" ती अकस्मात् म्हणाली. "तुम्ही माझ्या वडिलांच्या मित्रांचे चिरंजीव. तुमचं नांव सेड्रिक ना ?

"म्हणजे तूं अरफ्रीड तर नाहींस ?" सेड्रिकनें चटकन् आठवण होऊन म्हटलें.

तिनें सांगितलेली गोष्ट खरी होती. सेड्रिकच्या वडिलांच्या जिगर दोस्ताची ती मुलगी होती; पण गेलीं अनेक वर्षें तिचा पत्ता लागत नव्हता.

मग तिनें आपली कहाणी त्याला ऐकवली. सर रेजिनाल्डनीं तिला फसवून किल्ल्यांत आणलें होतें आणि कित्येक वर्षें बंदिवासांत ठेवलें होतें. रोज तिला भयानक छळ सहन करावा लागत होता.

"सूड, सूडाची वाट बघतें आहें मी !" विचित्र कर्कश आवाजांत ती ओरडली.

सेड्रिकनें तिची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. तिला सुटकेचेंही आश्वासन दिलें. पण ती तुच्छतेनें हसली.

"सुटका ? सुटकेची मला मुळींच इच्छा नाहीं. ह्या किल्ल्यांतच माझा शेवट होणार ! आणि मी ह्या किल्ल्याचा शेवट झाल्याशिवाय मरणार नाहीं.... ...आणि त्याच्या मालकाचाही !" तिनें विकट हास्य केलें.

इतक्यांत कोणाची तरी चाहूल लागली. अरफ्रीड चटकन् दुसऱ्या एका दारानें निघून गेली; आणि रेजिनाल्ड आंत आला. सेड्रिकनें आपला चेहरा शक्य तों अंधारांत राहील अशी खबरदारी घेतली.

"बुवा, माझं एक काम कराल, तर बरंच पुण्य लागेल तुम्हांला." रेजिनाल्ड म्हणाला.

"आज्ञा व्हावी, महाराज !" मोठ्या कष्टानें आपल्या आवाजांत नम्रता आणीत सेड्रिकनें उत्तर दिलें.

"मी एक पत्र देतों तें माझे मित्र सरदार फिलिप मॅलव्होझिन ह्यांना नेऊन द्यायचं !"

"अवश्य, अवश्य, महाराज ! कितीही धोका पत्करून मी हें काम आनंदानें पार पाडीन."

सर रेजिनाल्डनीं ह्या नकली धर्मगुरूला किल्ल्याच्या मागील भागांत नेलें आणि एक गुप्त दरवाजा उघडून दिला. सेड्रिकनें मोठ्या आनंदानें बाहेर पाऊल टाकलें. पण बाहेर पडतो न पडतो तों आपण धर्मगुरु आहोंत हें तो विसरला ! रेजिनाल्डला त्याच क्षणीं शंका आली. त्यानें तात्काळ तटावरील तिरंदाजांना बाण मारण्याचा हुकूम दिला. पण सुदैवानें सेड्रिक त्वरेनें काळोखी जंगलांत घुसला आणि दिसेनासा झाला.

रेजिनाल्डचा संशय आतां चांगलाच बळावला. तो तडक मागें फिरला आणि सेड्रिकच्या कोठडींत आला. सेड्रिकच्या वेषांतील वाम्बाकडे पाहतांच त्याच्या सारें लक्षांत येऊन चुकलें. वाम्बाला त्यानें तात्काळ अंधारकोठडींत हलवण्याचा हुकूम दिला. सेड्रिक निसटला ह्याचा अर्थ आतां कांहींतरी हालचाल होणार हें उघड होतें. सर रेजिनाल्डनीं किल्ल्यांतील सैनिकांना भराभर हुकूम सोडण्यास सुरवात केली. द ब्रासी आणि गिलबर्ट ह्यांजबरोबर वाटाघाटी करून तिघांच्या हाताखालीं किती लोक घ्यायचे आणि कोणीं कुठें उभें राहून शत्रूला तोंड द्यायचें हें त्यानें ठरवून टाकलें.

इतक्यांत दूरवरून गलबलाट ऐकूं येऊं लागला. हल्लेखोरांनीं किल्ल्याच्या दिशेनें कूच केलें होतें.

# १२ किल्ल्यावर चढाई


ॲश्बीचे सामने संपल्यावर आयव्हॅनो जेव्हां बेशुद्ध झाला तेव्हां रिबेक्काच्या नोकरांनीं घाई करून त्याला तिच्या वाड्यांत हलवलें. त्या काळच्या स्त्रियांना चालीरीतीनुसार वैद्यकीचें शिक्षण दिलें जाई. त्यांतल्या त्यांत ज्यू वैद्य तर प्रसिद्धच असत. ख्रिश्चन लोक ज्यू लोकांचा कितीही द्वेष करीत असले तरी ज्यू वैद्याशिवाय त्यांचें चालत नसे. रिबेक्काही त्या कलेंत निष्णात होती. कोणतीही जखम बरी करणारें एक दिव्य मलम तिच्यापाशीं आहे असें लोक बोलत असत.

कांहींही असो, रिबेक्कानें मनोभावें शुश्रूषा केल्यामुळें म्हणा अथवा तिच्याजवळ असलेल्या त्या दिव्य औषधामुळें म्हणा, आयव्हॅनोची जखम सपाट्यानें भरून येऊं लागली. त्याच वेळीं अर्थात् इझाकला तें गांव सोडावें लागलें. आणि वाटेंत त्याचे संरक्षक आयव्हॅनोसह त्याला सोडून पळाले. पण त्या प्रदेशांत द ब्रासी वगैरेंचा अंमल असल्यामुळें आयव्हॅनो त्यांच्या हातांत सांपडला. द ब्रासी धूर्त होता. आयव्हॅनो आपल्या हातांत आहे त्याचा फायदा आपल्याला कशा प्रकारें घेतां येईल हें त्यानें ओळखलें. सर रेजिनाल्डच्या किल्ल्यांत एका दूरच्या खोलींत त्यानें आयव्हॅनोला बंदिस्त करून ठेवलें.

आयव्हॅनोला ह्याच किल्ल्यांत आणलें गेलें आहे, ही गोष्ट रिबेक्काला कळली होती. ज्या वेळेस बाहेरून किल्ल्यावर हल्ला होणार ही गोष्ट स्पष्ट झाली, त्या वेळेस कैदी लोकांच्या कोठडींवर पहारा करणारे रखवालदार किल्ल्याच्या रक्षणार्थ काढून घेण्यांत आले. वाम्बा, इझाक, ॲथलस्टेन वगैरेंना जसें कोंडून ठेवण्यांत आलें होतें, तशी रिबेक्काची स्थिति नव्हती. त्यामुळें आपल्यावर कोणी पहारा करण्यास नाहीं हें

पाहतांच तिनें इतरांचा शोध घ्यायला सुरवात केली. बाकीचे लोक तळघरांत बंदिस्त असल्यामुळें तिला सांपडूं शकले नाहींत. मात्र एका बाजूच्या खोलींत जखमी आयव्हॅनो तिला सांपडला.

आयव्हॅनो आपल्या बिछान्यावर तळमळत पडला होता. किल्ल्याबाहेर कांहींतरी गडबड चालली आहे हें त्याच्या सहज कानांवर आलें होतें; आणि त्याविषयीं साधारण अंदाजही त्यानें बांधला होता पण स्वतःला त्यांत कांहींच कामगिरी बजावतां येत नाहीं ह्याबद्दल बिचाऱ्याला खंत वाटत होती. खोलीला असलेल्या एका खिडकींतून मात्र बाहेर काय चाललें आहे हें रिबेक्का पाहूं शकत होती. खिडकींतून येणारा बाण आपल्याला लागूं नये म्हणून तिनें एक युक्ति केली होती. खोलींतलें एक मोठें मेज उलटें करून त्याच्या आडून ती बाहेर टेहळणी करीत होती.



 कैशोर ७७ 

"हल्ला करणाऱ्यांच्या अग्रभागीं कुणाची पताका फडकत आहे ?" आयव्हॅनोनें विचारलें. "पताका नाहींच मुळीं !" रिबेक्कानें उत्तर दिलें. "मात्र नखशिखान्त काळं चिलखत चढवलेला एक भव्य सरदार त्यांचा पुढारी आहे."

"कुणाचंच निशाण नाहीं हें आश्चर्यच आहे." आयव्हॅनो म्हणाला.

"अरे बापरे ! त्यांनीं हल्ला चढवला, बरं का ?" भयभीत आवाजांत रिबेक्का ओरडली.

"आणि मी मात्र इथें लोळत पडलों आहें ! रिबेक्का, शिरले का ग आंत ते ?"

"नाहीं, नाहीं ! सर रेजिनाल्डनीं एकदम त्या काळ्या सरदारावर हल्ला चढवला ! आई ग ! घसरला तो !" रिबेक्कानें डोळे घट्ट मिटून घेतले.

"कोण घसरला ?" आयव्हॅनोनें जवळ जवळ उठत विचारलें.

"काळा सरदार ! पण नाहीं....नाहीं ! पुन्हा उठून उभा राहिला ! त्यानें एका माणसाकडून कुऱ्हाड हिसकावून घेतली आणि तो रेजिनाल्डवर धावून चालला आहे ! अरे बापरे ! कोसळताहेत ते ! पडले–सर रेजिनाल्ड पडले ! किल्ल्यांतले लोक त्याला आंत ओढून आणताहेत !"

"पण अजून त्यांना शिरायला नाहीं ना मिळालं ?"

"नाहीं, अजून नाहीं ! पण तो काळा सरदार आपल्या कुऱ्हाडीनें दारावर घाव घालतो आहे. वरून लोक दगड, जळकीं लाकडं टाकताहेत. पण अजून त्यानें दाद दिलेली नाहीं.......ओहो, दरवाजा कोसळला ! नाहीं, पण गिलबर्टनें खंदकावरचा पूल पाडलेला आहे. त्यामुळें त्यांना आंत येतां येत नाहीं."

युद्ध किंचित् थबकल्यासारखें झालें. रिबेक्कानें मागें वळून पाहिलें आयव्हॅनो दमून गाढ झोपीं गेला होता. कमालीच्या उत्कंठेनें त्याच्या जखमेवर ताण पडला होता आणि पुन्हा त्याला ग्लानि आली होती.

सरदार रेजिनाल्ड भयंकर जखमी झाला होता. त्याला त्याच्या अनुयायांनीं झटकन् आंतल्या भागांत आणून ठेवलें. मात्र त्याच्या जखमांकडे लक्ष द्यायला कोणालाच सवड नव्हती !

"अजून जिवंत आहेस, रेजिनाल्ड ?" त्याच्या कानांवर एक कर्णभेदी आवाज पडला. त्या तशा स्थितींतही त्यानें तो आवाज पूर्ण ओळखला. त्याच्यासमोर अर्फ्रीड उभी होती.

"तुला शांतपणें मरूं देणार नाहीं मी." कुत्सित स्वरांत ती म्हणाली. "आपल्या दुष्कृत्यांची आठवण करीत करीत तुला मरावं लागेल. हा किल्ला आतां माझा आहे. मी काय वाटेल तें करणार आहें त्याचं ! सूड घेणार मी आज ! लवकरच पहाशील तूं काय होतं तें !"

तिनें विकट हास्य केलें. सर रेजिनाल्डच्या तोंडांतून शब्द फुटत नव्हता. आपल्या खोलीचें दार लागलेलें नि त्याला कुलूप घातलेलें त्यानें ऐकलें.

# १३ सुटका

गिलबर्टच्या सैनिकांनीं खंदकावरचा पूल उध्वस्त केल्यामुळें आक्रमकांना अजून किल्ल्यांत प्रवेश मिळाला नव्हता. पण थोडा वेळ शांतता निर्माण झाली आहे हें पाहून काळ्या सरदारानें जंगलांत मिळतील ते ओंडके आणून त्यांचा एक मोडकातोडका पूल तयार केला. तो पूल तयार होत असतांना तटावरून हल्ला करण्यास कोणी धजावत नव्हतें. कारण लॉक्सलेच्या तीक्ष्ण बाणांची धास्ती होती ना !

पुलाचा सांगाडा तयार होतांच काळ्या सरदारानें लॉक्सलेच्या तिरंदाजांना हुशार राहण्याची खूण केली, आपल्या सैनिकांना सावध केलें आणि धाडकन् तो सांगाडा खंदकावर आडवा टाकला. पाठोपाठ त्यानें, सेड्रिकनें आणि त्यांच्या अनुयायांनीं गर्जना करीत तटावर धाव घेतली. तटाच्या भिंतींना शक्य तितकें बिलगून त्यांनीं लाकडी दरवाजावर कुऱ्हाडीचे घाव घालण्यास सुरवात केली. पण मागून येणाऱ्या त्यांच्या अनुयायांवर मात्र तटावरून बाणांचा वर्षाव झाला आणि त्यांना माघार घेणें भाग पडलें. तटावरून एक सैनिक खालीं वाकला भिंतीला अगदीं चिकटून उभ्या असलेल्या सेड्रिकवर आणि काळ्या सरदारावर आतां तो बाण सोडणार, इतक्यांत लॉक्सेलच्या अचूक तिरंदाजीनें आपलें काम चोख बजावलें !

द ब्रासी आतां आपल्या सैनिकांवर चिडला. दारावर प्रहार करणाऱ्या दोघांचा कोणीच प्रतिकार करूं शकत नाहीं हें पाहून तो स्वतः पुढें आला आणि तटावरचा एक प्रचंड दगड खालीं लोटून त्यानें त्या पुलाचा निकाल लावला. लॉक्सलेनें सटासट तीन बाण सोडले, पण द ब्रासीच्या अभेद्य चिलखतानें एकालाही दाद दिली नाहीं. आतां परिस्थिति गंभीर बनली होती. द ब्रासीच्या धाडसामुळें चेव येऊन



त्याचे सैनिक पुढें सरसावले होते आणि सेड्रिक आतां त्यांच्या आटोक्यांत आला होता. खालच्या लोकांनीं ही परिस्थिति हेरली आणि गर्थनें आणि लॉक्सलेच्या टोळींतील बुवांनीं सेड्रिकला वांचवण्यासाठीं धडाधडा खंदकांत उड्या घेतल्या.

इतक्यांत किल्ल्यामध्यें पुन्हा गडबड उडाली. गिलबर्टची आरोळी ऐकूं आली—" आग, आग! लोकहो, पिछाडीला चला! किल्ला जळतो आहे!! "

किल्ल्याच्या मध्यभागानें एकदम पेट घेतला होता. ज्या खोलींत जखमी सर रेजिनाल्डना ठेवलें होतें त्या खोलींतून काळा धूर बाहेर पडत होता. अरफ्रीडनें आपला सूड पूर्ण केला होता !

त्याच वेळेस काळ्या सरदाराच्या प्रचंड आघातापुढें प्रवेशद्वाराचा निकाल लागून तें कोसळलें. द ब्रासीनें सरळ आंत शिरूं पहाणाऱ्या

काळ्या सरदारावर हल्ला केला. तलवारीचा आणि कुऱ्हाडीचा क्षणभरच खणखणाट झाला. काळ्या सरदाराचा एक जोराचा प्रहार जरी द ब्रासीनें ढालीवर घेतला तरी त्या तडाख्यामुळें तो मागच्या मागें कोसळून पडला.

" मुकाट्यानें शरण ये, द ब्रासी ! " काळा सरदार हुकुमी आवाजांत म्हणाला.

" शरण ? अनोळखी माणसापुढें मी कधींच शरणागति पत्करणार नाहीं. मग जीव गेला तरी बेहत्तर ! "

काळा सरदार किंचित् खालीं वाकला आणि द ब्रासीच्या कानांत कांहीं पुटपुटला. द ब्रासीचा आवाज तात्काळ खालीं आला.

" मी परत येईतोंपर्यंत इथेंच थांब. " काळा सरदार अधिकार-वाणीनें त्याला म्हणाला. द ब्रासीनें कांहींही न बोलतां मान लववली. "पण......." कांहींतरी आठवल्यासारखें करून तो म्हणाला, " जखमी आयव्हॅनो ह्याच किल्ल्यांत आहे. त्याची मुक्तता झाली नाहीं तर...... आग वेगानें पसरते आहे. "

" कुठें आहे तो ? "

द ब्रासीनें त्या भागाकडे बोट दाखवलें आणि काळा सरदार चटकन् तिकडे वळला.

थकून झोपीं गेलेल्या आयव्हॅनोला रिबेक्कानें घाईघाईनें जागें केलें.

" आग ! किल्ला जळतो आहे. काय करायचं आतां आपण ? " तिनें भीतियुक्त स्वरांत विचारलें. " पळ, रिबेक्का ! तुझा जीव वांचव ! " आयव्हॅनो ओरडला, " कारण मला आतां कुणीच वांचवूं शकणार नाहीं. "

" नाहीं ! " ती निश्चयी स्वरांत उत्तरली, तुला मरणाच्या दारीं सोडून

मी कधींच निघून जाणार नाहीं !.......पण माझे बाबा ! काय झालं असेल त्यांचं ?"

इतक्यांत त्या खोलींचें दार उघडलें आणि रक्तानें न्हालेला गिलवर्ट आंत शिरला. "रिबेका, चल माझ्याबरोबर ! आतां फक्त मीच तुला वांचवूं शकेन." तो हुकुमी स्वरांत म्हणाला.



"नाहीं, नाहीं ! प्राण गेला तरी मी तुझ्याबरोबर येणार नाहीं." रिबेकानें उसनें अवसान आणून उत्तर दिलें खरें, पण आपली काय स्थिति होणार हें तिला माहीत होतें. कारण गिलबर्टनें एखाद्या फुलासारखें तिला उचललें आणि तो बाहेर पडला. गरजणाऱ्या आयव्हॅनोकडे लक्ष देण्याची त्याला मुळींच जरूर वाटली नाहीं.

कांहीं मिनिटेंच गेलीं असतील. आयव्हॅनोच्या आरोळ्या अजून थांबल्या नव्हत्या.

"तुझ्या ओरडण्यामुळेंच तूं मला सांपडलास, आयव्हॅनो." काळा सरदार आंत येत म्हणाला.

"माझ्याकडे लक्ष देऊं नका! त्या गिलबर्टचा पाठलाग करा! सेड्रिक-रोवेना यांची आधीं मुक्तता होऊं दे!" आयव्हॅनो म्हणाला.

"तुझ्यानंतर त्यांची पाळी." त्याला शांत आवाजांत उत्तर मिळालें. त्या धिप्पाड सरदारानें जखमी आयव्हॅनोला सहज उचललें. अगदीं गिलबर्टनें रिबेक्काला उचललें होतें तितक्या सहजतेनें!

सेड्रिकनें, गर्थला बरोबर घेऊन रोवेना होती त्या बाजूस प्रवेश केला आणि रोवेनाची मुक्तता केली. वाटेंत त्यांना किंकाळ्या ऐकूं आल्या. तो इझाक होता. त्याचीही सुटका झाली हें सांगायला नकोच. चतुर वाम्बानें स्वतःची आणि ॲथलस्टेनची केव्हांच सुटका करून घेतली होती.

गिलबर्टनें रिबेक्काला बरोबर घेतलें आणि वाटेंत येईल त्याला सपासप कापीत तो वाड्याच्या दक्षिण बाजूस निघाला. तेथें अजूनही खणाखणी चालू होती. तिकडे मुळींच लक्ष न देतां त्यानें एका मोकळ्या घोड्यावर उडी मारली आणि तो दक्षिण दरवाजाच्या रोखानें पुढें निघाला. इतक्यांत त्याला ॲथलस्टेन आडवा आला.

"तो कुणातरी बाईला पळवून नेतो आहे." वाम्बा गिलबर्टकडे पाहून ओरडला. ॲथलस्टेनला ती स्त्री नीट दिसली नाहीं, पण ती रोवेना असावी अशी त्याची खात्री झाली. आपल्या हातांत शस्त्र नसतांनाच त्यानें चिडून गिलबर्टवर झडप मारली. पण गिलबर्ट सावध

होता. त्यानें ती उडी चुकवली आणि दुसऱ्या क्षणीं त्याची तलवार ॲथलस्टेनच्या खांद्यांत घुसली. ॲथलस्टेन पडला.

दरवाजापाशीं आपला रस्ता रोखून धरणाऱ्या सैनिकांना गिलबर्टनें केव्हांच लोळवलें आणि प्रचंड वेगानें दौडत तो किल्ल्याबाहेर निघून गेला.

आगीनें उग्र स्वरूप धारण केलें होतें. भीषण आवाज करीत वाड्याचा एकेक भाग आगीच्या भक्ष्यस्थानीं पडत होता. किल्ल्यांत राहण्यांत आतां कांहींच अर्थ नव्हता. विजयोन्मादानें उड्या मारीत लॉक्सलेच्या रंगेल गड्यांचा लोंढा किल्ल्याबाहेर पडला. मात्र येतांना प्रत्येकानें मिळेल तितकी लूट मारायला कमी केलें नव्हतें !

किल्ल्याच्या मालकाला वांचवण्याचा कोणींच प्रयत्न केला नाहीं. त्या बापड्या अरफीडचें पुढें काय झालें हें सुद्धा कोणाला कळलें नाहीं !

# १४ जंगलांतला समारोप

एका भव्य ओक वृक्षाखालीं लॉक्सलेनें आपला ' दरबार ' भरवला. प्रत्येकानें आपल्याजवळ असलेलें लुटीचें सामान मध्यभागीं आणून ठेवलें आणि त्याचा एक ढीग तयार केला. पुष्कळशीं चांदीचीं भांडीं, लखलखीत तलवारी, चिलखतें आणि भरजरी वस्त्रें वगैरे अनेक चिजा त्यांत होत्या.

त्या वृक्षाला लागून एक उंच कट्टा तयार करण्यांत आला होता. त्यावर लॉक्सले आणि त्याचे दोन निकटचे साथीदार, सेड्रिक, रोवेना, काळा सरदार वगैरे ' बडी मंडळी ' विराजमान झाली होती. पण सर्वांना माहीत होतें कीं जंगलचा राजा लॉक्सले आहे आणि त्याच्या आज्ञेशिवाय इकडचें पान तिकडे होणें येथें शक्य नाहीं.

लॉक्सलेनें लूट आपल्या अनुयायांत वांटून देण्यास सुरवात केली. त्याचा शब्द म्हणजे कायदा होता. कोणाचीही त्याच्या निर्णयाविरुद्ध जाण्याची प्राज्ञा नव्हती.

तरीही तो जंगलचा राजा त्या शूर काळ्या सरदारापुढें मात्र नम्र झाला. जमवलेल्या ' वस्तूं'तून पाहिजे ती उचलण्याची त्यानें त्याला विनंती केली. काळ्या सरदारानेंही ती आनंदानें मान्य केली. " दोस्त लॉक्सले, " तो म्हणाला, " माझी मागणी म्हणजे द ब्रासी मला मिळावा, आणि त्याचं कांहींही करण्यास मला मुभा असावी."

लॉक्सलेनें तात्काळ द ब्रासीला पुढें घेऊन येण्यास फर्मावलें.

" द ब्रासी ! जा, मीं तुला जीवदान दिलं आहे. " खालीं मान घालून उभ्या राहिलेल्या द ब्रासीला काळा सरदार म्हणाला. " मात्र लक्षांत ठेव द ब्रासी, मीं मघांशीं तुला सांगितलं तें लक्षांत ठेव ! "

द ब्रासीनें मान लववली. त्याला मोकळा सोडल्याबद्दल लोकांच्यांत

थोडी कुजबुज झाली. पण लॉक्सलेनें सर्वांना शांत केलें. द् ब्रासीला एक घोडा देण्यांत आला आणि तो तत्क्षणीं निघून गेला.

लुटीपैकीं कांहीं भाग धार्मिक कार्यांच्या मदतीसाठीं वेगळा काढण्यांत आला, कांहीं भाग मृत सैनिकांच्या कुटुंबीयांना देण्याचें ठरलें आणि नंतर उरलेली लूट इतरांमध्यें वांटून टाकण्यांत आली. हा सर्व समारंभ इतक्या शिस्तींत पार पडला कीं काळ्या सरदाराला अतिशय आश्चर्य वाटलें. त्यानें मोठ्या प्रेमानें लॉक्सलेची पाठ थोपटली.

नंतर लॉक्सलेच्या टोळींतील बुवांनीं एका म्हाताऱ्याला पुढें आणलें. तो इझाक होता. रिबेक्का कुठेंच दिसत नसल्यामुळें तो अधिकच हवालदील झाला होता.

"हा पाखंडी मनुष्य, मी त्याला वांचवल्याबद्दल आपली सर्व संपत्ति चर्चला द्यायला आणि स्वतःचा धर्म बदलायला तयार झाला होता," बुवा गरजले, "आणि आतां नाकबूल जातो आहे लेकाचा!"

इझाकनें दीनपणें काळ्या सरदाराकडे पाहिलें. बुवा इतके चिडले होतें कीं त्यांनीं आपला सोटा इझाकवर उगारला. इतक्यांत काळ्या सरदारानें त्यांना रोखून धरलें.

"माझ्या बाबतींत तूं कोण ढवळाढवळ करणार?" बुवा ओरडले.

"बुवा, हें धार्मिक कृत्य होत नाहीं!" काळा सरदार शांतपणें उद्गारला.

"आपल्या पहिल्या भेटीपासूनच तुझा उद्धटपणा मला कळून आला आहे! पहिला धडा मी तुलाच शिकवतों."

"अवश्य, अवश्य!"

काळ्या सरदाराच्या शांत, मिस्किल चेहऱ्याकडे लक्ष जातांच बुवांना अधिकच चेव चढला. त्यांनीं मूठ वळून त्याच्या कानाजवळ

असा तुफानी गुद्दा हाणला कीं सर्वांना वाटलें आतां सरदारजी कांहीं जिवंत सुटत नाहींत.

पण सरदारसाहेब तसेच मख्खपणें उभे होते. त्यांनी एकदा तोंडावरून हात फिरवला. " आतां तयार रहा, " ते बुवांना म्हणाले. आणि आपल्या पोलादी मुठीचा बुवांच्या गुबगुबीत गालांवर त्यांनीं असा जोराचा तडाखा लगावला कीं बुवांचा गरगरीत देह त्या एकाच सपाट्यांत आडवा झाला. सर्वांनीं बुवांची हुर्यो करून जंगल दणाणून सोडलें.

इझाकला रिबेक्काची काय दशा झाली ह्याची सविस्तर माहिती लॉक्सलेनें दिली. तो बिचारा तिच्या सुटकेचा जो प्रयत्न करील त्याला वाटेल तें देण्यास तयार झाला.



लॉक्सलेनें तें मान्य केलें आणि गिलबर्टला देण्यासाठीं एक पत्र तयार करण्यास त्यानें बुवांना सांगितलें. इझाकला सुरक्षित जागीं पोचवण्यासाठीं आपले कांहीं लोकही त्यानें त्याच्याबरोबर दिले.

सेड्रिकनें काळ्या सरदारानें केलेल्या मदतीबद्दल पुनः पुन्हा कृतज्ञता व्यक्त केली आणि तो आपल्या मंडळींसह निघाला. जातांना त्यानें मोठ्या अगत्यानें लॉक्सलेला आणि काळ्या सरदाराला आपल्या किल्ल्यांत पाहुणचार झोडण्यास येण्याचें आमंत्रण दिलें.

सर्वांत शेवटीं काळा सरदार जायला उठला. लॉक्सलेचा निरोप घेतांना त्याला गहिंवरून आलेलें दिसलें. त्यानें लॉक्सलेचा हात आपल्या हातांत घेऊन प्रेमानें दाबला आणि त्याचा निरोप घेतला. वाम्बा त्याला सोबत करीत होता.

# १५ रिबेक्का संकटांत !

जॉनचा तळ यॉर्क येथें पडला होता. त्याच्या कानांवर युद्धाची बातमी जाण्यास फारसा वेळ लागला नाहीं. मात्र त्याच्या कानांवर बातमी पडली ती अशी कीं सॅक्सन लोकांनीं उठाव केला आहे ! अनेक नवनवीन अफवांची त्यांत रोज भर पडत होती आणि त्यांतून खरें-खोटें शोधणें अवघड जात होतें.



त्यांत भर म्हणजे काळ्या सरदारानें मुक्त केलेला द ब्रासी जॉनकडे परतला होता. जॉनच्या कानाशीं लागून तो म्हणाला, "रिचर्ड इंग्लंडला परत आला आहे. मीं त्याला पाहिलं ! त्याच्याशीं बोललों !"

शिवाय सर रेजिनाल्ड मृत्यु पावल्याची आणि गिलबर्ट पळून गेल्याची बातमी पण त्यानें सांगितली. जॉन पूर्ण हतवीर्य होऊन गेला होता. रिचर्ड इंग्लंडबाहेर असेपर्यंत त्याला वाटेल तीं कारस्थानें लढवतां येत होतीं. पण खुद्द रिचर्ड विरुद्ध उभें ठाकण्याची छाती नव्हती त्याची त्यांत पुन्हा द ब्रासीनें सरळ शरणागति पत्करण्याचा सल्ला दिला. एकटा फित्झपर्स शरणागतीविरुद्ध होता. सुरक्षित स्थळीं जॉनला पोचवण्याची नि पुढील बेत लढवण्याची त्यानें हमी घेतली.

केवळ रिबेक्का आपल्या ताबडींत यावी म्हणून द ब्रासीला एकट्यालाच टाकून पळून जाणाऱ्या गिलबर्टचें वर्तन जॉनला आणि त्याच्या पक्षांतील इतर सरदारांना नापसंत होतें. हा एक प्रकारचा विश्वासघात होता. पण जॉन गिलबर्टला दुखवूं शकत नव्हता. कारण त्याच्या शौर्यावर आणि साहाय्यावर सद्य:स्थितींत भिस्त ठेवणें त्याला आवश्यक होतें.

पण गिलबर्टचें हें वर्तन एका व्यक्तीला मात्र पूर्णपणें नापसंत होतें. त्यासाठीं गिलबर्टला योग्य तें शासन देण्यासही ती व्यक्ति तयार होती. त्याचें असें होतें गिलबर्ट हा धर्मसंरक्षकांच्या पथकांतला सरदार होता. ख्रिस्ती धर्माचें पवित्र शहर जेरुसलेम तुर्कांच्या हातांतून सोडवण्यासाठीं खास धर्मसंरक्षकांचीं पथकें तयार करण्यांत आली होती. ह्या पथकांत सामील होणाऱ्यांना अत्यंत कडक शिस्तीचें पालन करावें लागे. केवळ धर्मपालनाकरितां जीवन खर्चीं पडावें हें त्यांचें ध्येय. त्यासाठीं त्यांना सर्व सुखसोयींचा त्याग करावा लागे. त्यांच्या शपथा अत्यंत कडक असत आणि त्या मोडणाऱ्याला कडक शिक्षा मिळे.

अर्थात् सर्वच धर्मसंरक्षक ह्या असिधाराव्रताचें पालन कठोरपणें करीत असतच असें मुळींच नाहीं. पुष्कळसे शपथा मोडण्यांत

वाकबगार होते ! मात्र हा गुन्हा उघडकीस आला कीं देहान्तशासन ठेवलेलें असे. त्यासाठीं ह्या धर्मसंरक्षकांचा एक नेता होता, आणि तो न्यायदानाचें काम करीत असे. तो स्वतः अत्यंत साधा आणि धर्मसंरक्षकांच्या नियमांचें कांटेकोरपणें पालन करणारा होता. त्यामुळें लोक त्याला फार मान देत असत. हा मनुष्य नुकताच इंग्लंडला परत आला होता. गिलबर्टची वागणूक त्याच्या कानांवर गेल्यावर त्याला अतिशय संताप आला. त्यांत पुन्हा गिलबर्टनें जिला पळवून



नेलें होतें ती एक ज्यू स्त्री आहे हें समजतांच तर त्याच्या अंगाचा भडका उडाला. गिलबर्टची चौकशी होऊन त्याला कडक शिक्षा मिळालीच पाहिजे असें त्याचें मत बनलें.

पण त्याचे सल्लागार आणि इतर सहकारी अधिक समजूतदार आणि विचारी होते. गिलबर्टला गमावणें म्हणजे आपल्या पंथाची केवढी

हानि होईल हें त्यांना पुरेपूर समजत होतें; कारण गिल्बर्टच्या तोडीचा शूर सरदार त्यांच्या पंथांत दुसरा नव्हता. त्यांनीं आपलें हें मत आपल्या नेत्याच्या कानांवर घालून त्याचें मन वळवण्याचा प्रयत्न आरंभला. बऱ्याच प्रयत्नानंतर त्यांना यश आलें. पण गिलबर्टच्या वर्तनाची 'कायदेशीर' चौकशी व्हायला हवीच होती; नाहींतर त्यांच्या पंथाला कायमचा काळिमा लागला असता.

तेव्हां त्या धूर्त लोकांनीं एक शक्कल लढवली. त्या काळांत वैद्यकी औषधें वगैरेंचें ज्ञान असणाऱ्या स्त्रियांना पुष्कळदा, त्या चेटूक करतात, धर्माविरुद्ध वागतात, नीति भ्रष्ट करतात अशा मोघम आरोपावरून जिवंत जाळण्याची भयंकर शिक्षा देण्यांत येत असे. ह्या माकडांच्या हातांत हें बरें कोलीत सांपडलें ! कारण रिबेक्काची तिच्या वैद्यकीय कौशल्याबद्दल ख्याति होती आणि तिच्याजवळ असलेल्या एका दिव्यौषधीनें कसलीही जुनाट जखम बरी होते असा लौकिक पसरला होता.

ह्या कावेबाज धर्मसंरक्षकांनीं 'रिबेक्का चेटूक करते' असा गवगवा सुरू केला- तिच्याजवळची दिव्यौषधि हें एक विषारी रसायन आहे आणि त्याच्या साहाय्यानें ती सद्‌गुणी ख्रिश्चन लोकांना धर्मभ्रष्ट करते असा कांगावा करणें त्यांनीं आरंभलें. गिलबर्टसारख्या साध्या, सरळ मनाच्या सरदारावर हिनें चेटूक केलें आणि त्याला दुर्वर्तन करण्यास भाग पाडलें असें लोकांना सांगण्यांत येऊं लागलें !

शेवटीं ह्या भयंकर 'चेटकिणी'वर खटला भरण्याचें ठरलें. गिलबर्टला केव्हांच निरपराधी ठरवण्यांत आलें होतें ! रिबेक्काविरुद्ध खोटानाटा पुरावा तयार करण्यांत आला. ती किती भयंकर कृत्यें करते ह्याबाबत मोठमोठ्या सरदारांच्या मुद्दाम तयार केलेल्या साक्षी काढण्यांत आल्या. बिचारी रिबेक्का ! तिच्या बाजूनें बोलण्यास कोणीच मिळेना. तिचे वडील, इझाकही ज्यूच. तेव्हां त्यांच्यावर

विश्वास कोण ठेवणार ? वृद्ध इझाकची छाती फाटून गेली होती. त्यानें परोपरीनें विनवण्या केल्या. आपल्या लाडक्या मुलीचा जीव वांचवण्यासाठीं आपली सारी संपत्ति देऊं केली. पण कशाचाही उपयोग झाला नाहीं.

तरीही रिबेक्कानें बाणेदारपणा सोडला नाहीं. आपल्यावर करण्यांत आलेल्या आरोपांचा तिनें अस्खलित शब्दांत धिक्कार केला. आपला शेवट समोर दिसत असतांनाही तिची मनःशांति कधीं ढळली नाहीं. आपल्याला योग्य न्याय मिळावा अशीच तिनें मागणी केली. दीनपणें क्षमेची याचना मुळींच केली नाहीं.

मोठ्या गंभीरपणें, पवित्र धर्मसंरक्षकांच्या न्यायी नेत्यानें आपल्यापुढें आलेला पुरावा पाहिला, साक्षी ऐकल्या. आणि तितक्याच गंभीरपणें



रिबेक्का दोषी असल्याचा त्यानें निर्णय दिला. शिक्षा अर्थात् एकच— जिवंतपणें चितेंत प्रवेश करणें !

तरी पण कांहींतरी औदार्याचा देखावा करणें आवश्यक होतें. म्हणून अत्यंत दयाशील अंतःकरणानें त्यानें रिबेक्काला एक सवलत देऊं केली. एखादा शूर शिलेदार जर रिबेक्काच्या बाजूनें हातांत शस्त्र घेण्यास तयार असेल, गिल्बर्टशीं दोन हात करून रिबेक्का निर्दोषी आहे हें सिद्ध करण्यास तयार होईल, तर त्या द्वंद्वयुद्धापर्यंत ही शिक्षा स्थगित ठेवली जाईल असें त्यानें जाहीर केलें.

ज्यू स्त्रीच्या बाजूनें कोणीही ख्रिश्चन शिलेदार हातांत शस्त्र धरणार नाहीं ही अर्थातच न्यायाधीशांची अपेक्षा होती. पण रिबेक्काला मात्र ही सवलत म्हणजे देवाची देणगीच वाटली. तिला माहीत होतें कीं गिलबर्टला तोंड देणारा एकच मनुष्य इंग्लंड-मध्यें आहे, आणि तो म्हणजे आयव्हॅनो. काळाच्या दाढेंतून तिनें आयव्हॅनोला वांचवलें होतें. तो आपली विनंती अमान्य करणार नाहीं अशी तिला खात्री होती. फक्त अडचण अशी होती कीं आयव्हॅनो अजून पूर्ण बरा झाला असेल कीं नाहीं ? तरीही आपल्या साहाय्यास धावून येण्याची विनंती करणारें एक पत्र तिनें आयव्हॅनोस लिहिलें आणि इझाकजवळ दिलें.

अशा वेळीं आयव्हॅनो कुठें होता ? काळ्या सरदारानें त्याला जखम पूर्ण भरून येईपर्यंत विश्रांति घेण्याची सक्त ताकीद दिली होती. पण बिछान्यांत पडून राहण्याची त्याला फारच आवड कीं नाहीं ! त्यामुळें जरा आपल्याला हिंडतां फिरतां येत आहे एवढें दिसल्याबरोबर त्यानें बिछाना गुंडाळून ठेवला होता आणि काळ्या सरदाराचा पत्ता काढण्यासाठीं स्वारी रवाना झाली होती.

# १६ काळा सरदार कोण होता ?

वाम्बाला बरोबर घेऊन काळ्या सरदारानें लॉक्सलेच्या दरबारांतून कूच केलें. दोघांचाही प्रवास मोठ्या मजेंत चालला होता. वाम्बा आपल्या खट्याळ मस्करीनें आणि असंबद्ध चर्पटपंजरीनें सरदार-साहेबांची करमणूक करीत होता. मधूनच दोघांनाही गाण्याची लहर येई. मग तानबाजी करून एकमेकांना हरवण्याची त्यांच्यांत शर्यत लागे.

इतक्यांत एक स्वार दौडत आला आणि त्यानें अत्यंत दुःखद वार्ता त्यांना सांगितली. नुकत्याच झालेल्या युद्धांतील जखमांमुळें ॲथलस्टेन मृत्यु पावला होता. सेड्रिक वगैरे सर्व मंडळी त्याच्या कॉनिंग्जबर्ग येथील किल्ल्यांत जमली होती आणि तेथेंच शोकसमाचारासाठीं येण्याचें आमंत्रण द्यायला तो स्वार आला होता.

ॲथलस्टेनच्या मरणाची बातमी ऐकून काळ्या सरदाराला अतिशय वाईट वाटलें. वाम्बाच्या तर डोळ्यांतून अश्रुधारा ओघळल्या. त्यांनीं आपले घोडे कॉनिंग्जबर्गच्या दिशेनें वळवले. हास्यविनोद आतां बंद झाला होता आणि दोघेही गंभीरपणें वाट आक्रमीत होते.

इतक्यांत वाम्बाचें लक्ष बाजूच्या झुडुपांकडे गेलें. त्याला कांहींतरी हालचाल दिसून आली. काळ्या सरदाराचें लक्ष तिकडे जाईपर्यंत दोन-तीन बाण सटासट त्यांना चाटून गेले. वाम्बाला फारशी जखम झाली नाहीं आणि काळ्या सरदाराच्या पोलादी चिलखतांतून ते बाण आंत प्रवेश करूं शकले नाहींत. काळ्या सरदारानें लगेच आपला घोडा त्या झुडुपांत घातला. एकदम सहा–सात जणांनीं त्याच्यावर हल्ला चढवला. पण काळ्या सरदाराच्या शरीराच्या मानानें त्याचें चापल्य वाखाणण्यासारखें होतें. पहिल्या दोन-तीन तडाख्यांत त्यानें

दोघां-तिघांना लोळवलें. त्याला जय मिळतो आहे असें वाटूं लागतांच आतांपर्यंत दूर उभ्या असलेल्या एका सरदारानें आपला घोडा त्वेषानें त्याच्या अंगावर घातला.

पण वाम्बालाही आतां चेव चढला. आपल्या जवळचें शिंग मोठ्या ऐटींत फुंकून त्यानें आपल्या शत्रूंवर हल्ला केला ! काळ्या सरदाराचा घोडा जखमी झाला होता. त्यामुळें त्यानें घोड्यावरून उडी मारली आणि आपली पाठ एका भव्य वृक्षाला टेकवून हल्लेखोरांना तोंड देण्यास सुरवात केली. हल्लेखोरांचा सरदार हातांतील भाल्यानें काळ्या सरदारावर हल्ला करणार एवढ्यांत वाम्बानें आपल्या छोट्या तलवारीनें त्याच्या घोड्यावर वार केला. घोडा अडखळला आणि स्वार खालीं आला.

पण काळ्या सरदाराची परिस्थिति गंभीरच होती. सात–आठ जणांशीं तो एकटा लढत होता. हळू हळू तो दमत चालला होता.

इतक्यांत पलीकडील जंगलांतून सूं सूं करीत पांच–सहा तीर आले आणि त्यांनीं हल्लेखोरांना तात्काळ गारद केलें. पाठोपाठ लॉक्सले आणि 'बुवा' ह्यांच्याबरोबर दहा–बारा रंगेल गड्यांची टोळी बाहेर पडली. उरलेल्या शत्रूंना त्यांनीं केव्हांच चीत केलें. काळ्या सरदारानें पुन्हा एकदा अतिशय आदबीनें लॉक्सलेचे आभार मानले.

सर्वांचें लक्ष हल्लेखोरांच्या नेत्याकडे गेलें. वाम्बानें त्याला धूळ चारल्यामुळें तो बिचारा पडून होता. मंडळींनी त्याचें शिरस्त्राण बाजूला केलें.

"फित्झपर्स !" काळा सरदार आश्चर्यानें उद्गारला. "तूं माझ्यावर हल्ला करायला धजावलास ?"

"होय ! सूड कोणीही घेऊं शकतो !"

" पण सूड कशासाठीं ? मीं तर तुझं कांहींच वाकडं केलेलं नाहीं."

" महत्त्वाकांक्षा पुष्कळदा माणसाला प्रवृत्त करते."

" अस्सं ! " काळा सरदार कांहीं काळ स्तब्ध राहिला. जणूं कांहीं एकेक गोष्टी त्याच्या हळूहळू लक्षांत येत होत्या.

" तूं जीवदान मागत नाहींस, फित्झपर्स ? "

" मला माहीत आहे, त्याचा उपयोग नाहीं ! "

" जा ! नादान माणसा, तुला जीवदान दिलं आहे. मात्र एक लक्षांत ठेव. तीन दिवसांत तुला इंग्लंड सोडावं लागेल. आणि दुसरं म्हणजे जॉनचं नांव ह्या बाबतींत तूं कधींही काढतां कामा नये. समजलं ? " त्यानें दरडावलें.

" लॉक्सले ! त्याला एक घोडा तयार करून द्या, अन् त्याला जाऊं दे ! "

लॉक्सले आणि त्याचे साथीदार ह्यांनीं थोडी नाखुषीच दाखवली. काळ्या सरदाराची चर्या एकदम बदलली.

" लॉक्सले, " काळा सरदार पुन्हा म्हणाला, " तुम्हांला माझी आज्ञा ऐकलीच पाहिजे. मी कोण आहें, माहीत आहे ? इंग्लंडचा राजा रिचर्ड ! "

जणूं कांहीं मंत्रानें भारल्याप्रमाणें लॉक्सलेनें चटकन् गुडघे टेकले. त्याच्या अनुयायांनींही त्याचें अनुकरण केलें.

" उठा, मित्रांनो ! " रिचर्ड म्हणाला. " तुमच्याविषयीं जरी अनेक तक्रारी माझ्या कानांवर आल्या असल्या तरी तुम्हांला माझ्याकडून अभय आहे. तुमचं शौर्य, तुमचा सच्चेपणा मी कधींच विसरणार नाहीं. लॉक्सले......."

" महाराजांनीं मला लॉक्सले म्हणूं नये. मला वाटतं, माझं खरं नांव महाराजांच्या कानीं आलेलं असावं. मला लोक रॉबिन हुड म्हणतात. "

" ओ, हो ! आपण कां ते ? आपली कीर्ति कुणीं ऐकलेली नाहीं ? "

रॉबिननें नम्रपणें मान वाकवली.

" महाराजांनीं दासाला क्षमा करावी. " एक वेगळाच आवाज रिचर्डच्या कानीं पडला.

" बुवा ! आतां काय झालं ? तुमच्या प्रांतांत पुन्हा ढवळाढवळ केली कीं काय मीं ? "

" महाराज, आपल्या पवित्र शरीरावर हात टाकला मीं ! " पश्चात्तापदग्ध स्वरांत टक–होय, तो टक पुजारीच होता–म्हणाला, " आपण आज्ञा द्या, आपल्यापुढें तो हात कापून ठेवतों. "

पण त्याची कांहींच जरूरी नव्हती. थोर अंतःकरणाच्या रिचर्डनें त्याला केव्हांच क्षमा केली होती.

इतक्यांत आणखी दोन स्वार तेथें उगवले. आयव्हॅनो आणि त्याचा विश्वासू सेवक गर्थ ही जोडी होती ती. विश्रांति घेण्याची आपली आज्ञा मोडून येथें आल्याबद्दल रिचर्ड राजा रागावला. पण तो मनोमन आधींपासूनच ओळखून होता कीं आपली एवढी आज्ञा पाळली जाणार नाहीं !

त्या रात्रीं शरवुडच्या जंगलांत जंगी मेजवानी झडली. इंग्लंडचा राजा एखाद्या सामान्य माणसाप्रमाणें त्या रंगेल वनवीरांत मिसळून गेला होता.

⚜

## १७ आश्चर्य

कॉनिंग्जबर्गकडे जातांना रिचर्डनें आयव्हॅनो आणि रॉबिन हुड या दोघांनाही बरोबर घेतलें होतें. आयव्हॅनोबरोबर त्याचा विश्वासू सेवक गर्थ होता. रॉबिन हुडचा पाठीराखा होता जॉन लिटल्, आणि वाम्बा रिचर्डला सोबत करीत होता.

कॉनिंग्जबर्गचा किल्ला जवळ येतांच रिचर्डनें आयव्हॅनोला शिरस्त्राण चढवून चेहरा झाकून घेण्यास सांगितलें; कारण सेड्रिक आणि आयव्हॅनो या दोघांमध्यें कसे मतभेद आहेत तें त्याला पक्कें माहीत होतें.

कॉनिंग्जबर्गचा किल्ला प्रचंड होता. अगदीं पुढील मनोऱ्यावर काळा ध्वज फडकत होता. प्रवेशद्वारापाशींच सेड्रिकनें अत्यंत व्यथित मुद्रेनें त्यांचें स्वागत केलें, आणि त्यांना आंतील दिवाण-खान्यांत नेलें. तेथें एका चौथऱ्यावर शवपेटिका ठेवलेली होती आणि तिच्या सभोंवती बसून धर्मगुरु अत्यंत खालच्या आवाजांत मंत्र म्हणत होते. तेथें कांहीं वेळ प्रार्थना झाल्यावर सेड्रिकनें पुन्हा आपल्या मागून येण्याची त्यांना खूण केली.

समोरचा छोटा जिना चढून गेल्यावर त्यानें डाव्या बाजूची एक लहानशी खोली उघडली. आंत साधारणपणें अंधार होता. एका छोट्याशा खिडकींतून एक प्रकाशाची तिरीप आंत येत होती. त्या प्रकाशांत काळीं वस्त्रें परिधान केलेली एक स्त्री खालीं मान घालून बसलेली होती.

" एडिथ, " सेड्रिक म्हणाला, " माझी कांहीं मित्रमंडळी आपली सहानुभूति व्यक्त करायला आलेली आहेत. युद्धांत त्यांची आम्हांला अमोल मदत झाली."



"मी आपले आभार मानतें. माझ्या मुलाचा असा दुःखद शेवट झाला नसता तर मला निश्चितच आपल्या शौर्याचा गौरव करतां आला असता." ती स्त्री सावकाशपणें उत्तरली.

रिचर्डसह सर्वांनीं तिला नम्रतापूर्वक अभिवादन केलें आणि ते मागें फिरले. नंतर सेड्रिकनें त्यांना दुसऱ्या एका मोठ्या दालनांत आणलें आणि तेथें विश्रांति घेण्याची सूचना केली.

कांहीं वेळ सर्वजण तेथें बसले असतील नसतील, तेवढ्यांत त्या दालनाच्या दुसऱ्या बाजूचें एक दार सावकाश उघडलें गेलें. सर्व त्या बाजूला पहात होते. कित्येकांच्या तोंडून एकदम अस्फुट किंकाळी बाहेर पडली, कित्येक भीतीनें पांढरेफटक पडले. कारण त्या दारांतून, सावकाश एकेक पाऊल उचलीत, अॅथलस्टेन आंत येत होता!

इतक्यांत बाहेर एकदम गलबलाट ऐकूं आला.

" पकडा, पकडा त्या दुष्टांना ! फेका त्यांना तळघरांत ! "

" अरे बापरे ! " भीतीनें भिंतीचा आधार घेत घोगऱ्या आवाजांत सेड्रिक म्हणाला, " तूं जिवंत आहेस ? बोल, बोल ! "

ॲथलस्टेन सावकाश एका कोचावर बसला. " जिवंत ? हो तुमच्यासारखाच चांगला जिवंत आहें मी ! " तो करुण स्वरांत म्हणाला. " पण तीन दिवसांचा उपाशी आहें ! त्या नीचांनीं मला पाणीही दिलं नाहीं. " त्याला बोलतांना धाप लागली.

" पण ॲथलस्टेन, मीं स्वतः तुला गिलबर्टच्या हल्ल्यामुळें पडतांना पाहिलं. " रिचर्डचें आश्चर्य अजून ओसरलें नव्हतें.

ॲथलस्टेन फारसा बोलण्याच्या मनःस्थितींत नव्हता. तो जिवंत असल्याची बातमी वाऱ्यासारखी किल्ल्यांत पसरली. त्याला प्रथम खाण्यापिण्यास देण्यांत आलें. त्याच्या आईला ही आनंदाची बातमी सांगण्यांत आली. खाऊनपिऊन ताजातवाना झाल्यावर ॲथलस्टेननें आपलें रहस्य सांगायला सुरवात केली.

" गिलबर्टनें मला जो तडाखा हाणला त्यामुळें मला जखम झाली नाहीं, पण घाव वर्मीं बसल्यामुळें मी तात्काळ बेशुद्ध झालों. किती वेळ मी बेशुद्ध होतों, कोण जाणे ! पण जेव्हां शुद्धीवर आलों तेव्हां मी शवपेटिकेंत होतों ! सुदैवानें ती उघडी होती म्हणून मी बाहेर पडूं शकलों. मी पाहिलं तों आपण चर्चमध्यें आहों. तिथें कांहीं उपाध्ये होते त्यांनीं मला पाहिलं. मी त्यांच्याजवळ तरतरी येण्यासाठीं थोडी दारू मागितली. त्यांनीं ती दिली. पण त्यांत कांहींतरी औषध टाकलेलं असावं. कारण मला तात्काळ झोप लागली.

" ते धर्मगुरुसाहेब महानीच बदमाष होते. संपत्तीच्या लोभानें मला त्यांनीं उचलून अंधारकोठडींत टाकलं आणि मी मेल्याची अफवा

उठवली. रोज रात्रीं माझ्या कोठडींत ते आळीपाळीनें येत आणि माझी दशा बघून जात. मी भुकेनें खंगत चाललों होतों. एक दिवस मात्र त्यांच्यापैकीं एक दारू पिऊन तर्र होऊन आंत आला. मीं माझी वेळ साधली. होतं नव्हतं तेवढं बळ एकवटून मीं त्याच्यावर हल्ला केला. तो नशेंत असल्यामुळें फारसा प्रतिकार करूं शकला नाहीं. मीं त्याच्याकडून किल्ली हिसकावून घेतली आणि दार उघडून बाहेर पडलों."

हा अद्‌भुत वृत्तान्त ऐकतांना सर्वजण आश्चर्यानें निस्तब्ध झाले होते. अँथलस्टेन जिवंत आहे असें पाहून त्याच्या आईच्या डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले होते. म्हाताऱ्या सेड्रिकलाही अगदीं गहिंवरून आलें होतें. सर्वांनींच सुखरूप सुटका झाल्याबद्दल अँथलस्टेनचें अभिनंदन केलें आणि त्याला दीर्घायुरारोग्य चिंतिलें. त्या किल्ल्यावरील अवकळा एकदम नाहींशी झाली आणि एक जंगी मेजवानी सिद्ध करण्याचा अँथलस्टेननें हुकूम दिला. त्या दुष्ट उपाध्यांची मात्र तात्काळ अंधारकोठडींत रवानगी करण्यांत आली.

इतक्यांत एक दूत घाईघाईनें त्या खोलींत शिरला आणि त्यानें आयव्हॅनोच्या कानांत कांहींतरी सांगितलें. आयव्हॅनो तात्काळ जागेवरून उठला आणि तीरासारखा खोलीबाहेर पडला. कोणालाच काय झालें आहे हें समजेना. नेमकें काय झालें आहे हें पहाण्यासाठीं रिचर्ड पाठोपाठ बाहेर पडला. नंतर सेड्रिक, रोवेना ही मंडळीही बाहेर आली. क्षणभर इतका गोंधळ उडाला कीं कोणालाच कांहीं समजेना.

शेवटीं असा पत्ता लागला कीं कोणी एक ज्यू मनुष्य आला होता. त्यानें आयव्हॅनोसाठीं एक पत्र आणलें होतें.

मंडळी आयव्हॅनोला पहाण्यासाठीं लगबगीनें किल्ल्याच्या मध्यभागीं असलेल्या चौकांत आली. तेव्हां संपूर्ण चिलखत चढवलेला आणि हातांत नंगी तलवार घेतलेला आयव्हॅनो एका सुसज्ज घोड्यावर आरूढ होतांना त्यांना दिसला.

तात्काळ घोड्याला त्यानें टाच दिली आणि विद्युद्वेगानें दौडत तो किल्ल्याबाहेर पडला.

*

# १८ परमेश्वरी न्याय

आज शेवटचा दिवस. न्यायाधीशांनीं रिबेक्काला दिलेली मुदत आज संपत होती. आज सूर्यास्तापर्यंत त्या दुर्दैवी स्त्रीच्या मदतीस कोणीच धावून आलें नाहीं तर तिला परमेश्वराकडे धाव घेणें भाग होतें.

आजूबाजूच्या खेड्यांत विलक्षण उत्सुकता पसरली होती. कोण हें आव्हान स्वीकारणार ? प्रत्येकजण निरनिराळे तर्क लढवीत होता. मात्र अजूनही कोणीच पुढें आला नव्हता. ऊन्ह कलल्यावर एका मोठ्या पटांगणांत उत्सुक प्रेक्षक जमा होऊं लागले. पटांगणाच्या पूर्व बाजूला एक भव्य सिंहासन ठेवण्यांत आलें होतें. त्यावर खुद्द न्यायाधीश विराजमान होणार होते. त्यांच्या दोन्ही बाजूंस इतर थोर धर्मसंरक्षकांना बसण्यासाठीं आसनें मांडलीं होतीं.

पश्चिम बाजूला एक मोठी चिता रचण्यांत आली होती. तिच्यावर चढून जाण्यास वाट तयार केली होती. त्या पापी प्राण्याला तेथपर्यंत जायला मदत करण्यासाठीं चार काळे गुलाम यमदूतांप्रमाणें सिद्ध होते.

मोकळ्या राहिलेल्या जागेंत प्रेक्षक भराभर जमा होत होते. अॅथलस्टेनच्या पुनरागमनाची बातमी त्यांना लागलेली दिसत होती कारण प्रत्येकाच्या तोंडीं तोच विषय होता आणि प्रत्येकजण तिखटमीठ लावून दुसऱ्याला ती हकीगत सांगत होता. मधूनमधून लोक आकाशाकडे पहात होते आणि अजून सूर्यास्त होण्यास किती वेळ आहे ह्याचा अंदाज बांधीत होते.

इतक्यांत चर्चच्या मनोऱ्यावरील घंटा सावकाश निनादली. सर्वांचें लक्ष तिकडे वळलें. पटांगणाच्या दक्षिण बाजूला असलेल्या गढीचें दार उघडलें गेलें. प्रथम उत्कृष्ट पोशाख केलेला एक शस्त्रधारी सरदार

धर्मसंरक्षकांची पताका घेऊन बाहेर पडला. पाठोपाठ तुतारीवाले होते. त्यांच्या पाठोपाठ सहा सशस्त्र घोडेस्वारांची तुकडी होती आणि त्या तुकडीमागें एका शुभ्र घोड्यावर न्यायाधीशमहाराजांची स्वारी होती.

न्यायाधीशांपाठोपाठ संपूर्ण चिलखत धारण केलेला गिलबर्ट आपल्या नेहमींच्या ऐटबाज पद्धतीनें बाहेर पडला. त्याच्या घोड्याचा रंग मात्र पूर्णपणें काळा होता. त्याचें चिलखत आणि इतर शस्त्रें उंची असलीं तरी आज तो त्याबद्दल फारशी पर्वा करीत नसावा असें दिसत होतें. त्याचा चेहरा निस्तेज, फिकट दिसत होता. त्याच्या मनावर बराच ताण पडला असावा असें वाटत होतें. त्याचे डोळे, त्यानें अनेक रात्री झोपेशिवाय काढल्या असाव्यात ह्याची साक्ष देत होते.

मागोमाग इतर धर्मसंरक्षकांचा तांडा आला. हे सर्व लोक स्थानापन्न झाल्यावर न्यायाधीशमहाराजांनीं पुन्हा एकदा दक्षिणेस नजर टाकली. चार-पांच सशस्त्र सैनिकांमध्यें आपल्या सौंदर्यानें उठून दिसणारी रिबेक्का येत होती. तिनें अत्यंत साधा, शुभ्र पोशाख परिधान केला होता. पण तिच्या चेहऱ्यावर निश्चयाचें पाणी चमकत होतें. ती चालतांना मुळीच अडखळत नव्हती. असामान्य धैर्यानें एकेक पाऊल शांतपणें उचलीत ती पुढें येत होती. क्षणभर साऱ्यांचे डोळे तिच्यावर खिळून राहिले. कित्येकांच्या तोंडून सहानुभूतिदर्शक उद्गार बाहेर पडले. चितेजवळ एक काळी खुर्ची होती. तीवर रिबेक्काला बसवण्यांत आलें. तिनें एकवार त्या चितेकडे निश्चल दृष्टि लावली आणि मग आपली नजर दुसरीकडे वळवली.

दरम्यान न्यायाधीश आपल्या सिंहासनावर स्थानापन्न झाले.

"मुली!" गंभीर आवाजांत ते म्हणाले, "अजून सूर्यास्ताला कांहींसा अवकाश आहे. तोंपर्यंत जर तुझ्या बाजूनें लढण्यास कोणी सिद्ध होईल तर शूर गिलबर्ट येथें त्याचं आव्हान स्वीकारण्यास सिद्ध आहे. मग परमेश्वरच न्याय देईल."



" माझा परमेश्वरावर पूर्ण विश्वास आहे." धीरोदात्त स्वरांत रिबेक्कानें उत्तर दिलें.

इतक्यांत गिलबर्टनें आपला घोडा रिबेक्काजवळ नेला.

" रिबेक्का, माझं ऐकतेस का ? " भरलेल्या आवाजानें तो म्हणाला.

" मला कांहींच ऐकायचं नाहीं. "

" माझं ऐक ! मला कांहींच समजेनासं झालं आहे. ह्यांनीं मला कां इथें आणलं आहे मला समजत नाहीं. रिबेक्का, ह्यांत माझा कांहीं दोष नाहीं "

" मला सुद्धा कांहींही समजेनासं झालं आहे ! "

" रिबेक्का, तुझं स्वातंत्र्य तुला मी अजूनही मिळवून देऊं शकेन."

किंचित् उत्तेजित स्वरांत गिलबर्ट म्हणाला. " चल, चटकन् घोड्या-वर उडी टाक. एका क्षणांत मृत्यूच्या पलीकडे मी तुला घेऊन जातों. जग काय वाटेल तें म्हणूं दे. एक नवीन, उज्ज्वल, सुखी जीवन तुझ्यापुढें उभं राहील, रिबेक्का ! "

" तें शक्य नाहीं. माझा शेवट होणार असेल तर तो इथेंच होऊं दे."

गिलबर्टचा चेहरा अधिकच काळवंडला. तो निमूटपणें आपल्या पूर्वीच्या जागेवर जाऊन उभा राहिला.

इतक्यांत प्रेक्षकांत एकदम गडबड उडाली.

" आला, आला ! " कांहींजण ओरडले. पटांगणाच्या उत्तर बाजूनें, वेगानें घोडा दौडवीत एक कवचधारी योद्धा मध्यभागीं आला आणि न्यायाधीशांसमोर ादन केलें.

BVBK-0400098

" शूर तरुणा, तुझं नांव ?

" आयव्हॅनो. "

" तुझ्या जखमा पूर्ण बऱ्या झाल्या ? " खोल गेलेल्या आवाजांत गिलबर्टनें त्याला विचारलें.

" त्याची तुला नको काळजी ! " आयव्हॅनो बेदरकारपणें उत्तरला.

" ठीक आहे ! तयार हो. "

" न्यायाधीशमहाराजांची मला परवानगी आहे ? " आयव्हॅनोनें विचालें.

" गुन्हेगार स्त्रीची हरकत नसेल तर माझी परवानगी आहे. "

आयव्हॅनो घोड्यावरून उतरून रिबेक्काजवळ गेला.

" रिबेक्का, तुझी परवानगी आहे ? "



रिबेक्कानें नुसतीच मान डोलावली. आनंदातिशयानें तिच्या तोंडून शब्द फुटला नाहीं.

दोन्ही प्रतिस्पर्धी समोरासमोर ठाकले. ललकाऱ्यानें सर्वांना शांत राहण्यास सांगितलें. न्यायाधीशमहाराज सावकाश उठले. त्यांनीं एकदा दोघांकडे बघितलें आणि ललकाऱ्यास खूण केली ललकाऱ्यानें आपली तुतारी फुंकली. आयव्हॅनो पुन्हा स्वार झाला.

तुतारीचे शब्द विरतात न विरतात तोंच प्रतिस्पर्ध्यांनीं एकमेकांवर त्वेषानें चाल केली. पण आयव्हॅनोचा दमलेला घोडा घसरला आणि गिलबर्टच्या अचूक प्रहारानें आयव्हॅनोही घोड्यावरून खालीं कोसळला. त्या मानानें आयव्हॅनोचा वार गिलबर्टच्या अंगास नुसता चाटून गेला.

तरीही त्याचा तोल गेला आणि तोही घोड्यावरून खालीं आला. सर्वांनाच आश्चर्य वाटलें.

आयव्हॅनोनें चटकन् आपल्याला सांवरलें आणि तलवार उगारून तो आपल्या प्रतिस्पर्ध्यावर चाल करून आला. पण त्याचा प्रतिस्पर्धी उठला नाहीं. आयव्हॅनोनें आपली तलवार त्याच्या गळ्याला टेकवून त्याला शरण येण्याची आज्ञा दिली. पण गिलबर्टकडून कांहींच उत्तर आलें नाहीं.

"थांब, त्याला ठार मारूं नकोस!" न्यायाधीश ओरडले. "तो शरण आला आहे असं मी जाहीर करतों."

आयव्हॅनो मागें सरला. इतर सैनिक चटकन् पुढें आले आणि त्यांनीं गिलबर्टला बसतें केलें; त्याचें शिरस्त्राण उतरवलें. काळवंडलेला निस्तेज चेहरा सर्वांच्या दृष्टीस पडला. गिलबर्टचे डोळे मिटलेले होते आणि त्याचा प्राण निघून गेला होता. आयव्हॅनोच्या तलवारीनें नव्हे, तर स्वतःच्या आत्यंतिक भावनांनीं गिलबर्टचा बळी घेतला होता!

"परमेश्वराची कृपा!" आकाशाकडे पहात न्यायाधीश उद्गारले.

रिबेक्का मुक्त झाली.

इतक्यांत पुन्हा आरडाओरड ऐकूं आला. आपल्या पूर्ण लवाजम्यानिशी रिचर्ड तेथें येऊन ठेपला. त्याच्या शरीरसंरक्षकांनीं तात्काळ इंग्लंडचे राजेसाहेब तेथें जातीनें हजर झाल्याची द्वाही फिरवली.

राजेसाहेबांनीं गिलबर्टच्या मृत देहाकडे एकदा नजर टाकली आणि त्याचें सन्मानपूर्वक दफन करण्याची आज्ञा दिली. आपल्या नेल्यापाठोपाठ धर्मसंरक्षक हळूहळू तेथून निघून गेले.

म्हातारा इझाक रिबेक्काला घेऊन परमेश्वराला दुवा देत निघून गेला.